

# जीवेत् शरदः शतम्!

अमृत महोत्सवाच्या
हार्दिक
शुभेच्छा



# ६३६
# रेणुका निवास



प्रिय मंदा,

तुझ्या ७५ व्या वाढदिवसनिमित्त तुला अनेक शुभाशिर्वाद!

तू व डॉ. प्रकाशराव तुमच्या कामांमध्ये इतके गढलेले असता की आता भेटी–गाठी दुर्मिळ होत चालल्या! त्यातुन तीन महिन्यांपूर्वी मला झालेल्या आजारपणानंतर व वयोमाना प्रमाणे माझी स्मृती आता अंधुक होत चालली, असो पण आपलं बालपण मात्र थोडं– थोडं आठवतं!

आपले पक्के संघप्रेमी बाबा आणि सेवासदन मध्ये शिक्षिका असणारी व गणित, संस्कृत वर, प्रभुत्व असणारी, काव्यरचना करण्यात तरबेज, अतिशय धार्मिक आणि कीर्तनकार अशी आष्टपैलू व्यक्तिमत्वाची पण खंबीर स्वभावाची 'आई'..!! आपण तिघी बहिणी असलो तरी आईची 'लाडकी' तूच होतीस.

तू लहानपणापासुन मितभाषी होतीस, पण तुझ्या हातात 'कौशल्य' होतं. तू शिक्षण चालू असतांना छंदविद्यालयात पण जायचीस, विणकाम, भरतकाम हयासारखे पारंपारिक प्रकार तुला येत होतेच पण तिथे शाडूच्या मातीचा गणपती बनवायला तू शिकली होतीस, त्या काळात वाळूच्या सहाय्याने तू काढलेली दोन चित्र माझ्या स्मरणात अजूनही आहेत व जशीच्या तशी नजरे समोर येतात....

थोडक्यात तुझी कलेतील प्रगती ही अगदी वाखाण्यासारखी होती..... रजत महोत्सवी शाळा, धरमपेठ कॉलेज आणि मग मेडीकल कॉलेज तुझी व नंदाची जोडी जी जमलीच ती जमलीच! तुम्ही दोघीही डॉक्टर झालात व त्यातले उच्च शिक्षण घेतलंत, त्यावेळी खरंच आपल्या आई–बाबांना खूप–खूप समाधान वाटलं!!

तू डॉ. प्रकाशरावांना जीवनसाथी निवडून हेमलकसा येथे काम करण्याचा निर्णय घेतलास आणि तिथे झोकुन देऊन कामही केलंस, तुम्हाला अनेक मोठमोठी बक्षिस मिळाली, तरीही तुम्ही दोघांनी तुमचा साधेपणा सोडला नाही हयाचे मला खूप कौतुक वाटते!

एक गमतीदार आठवण म्हणजे आपल्या आईच्या आग्रहाखातर हेमलकसा येथील प्रकल्पावर तुमच्या घरी झालेली 'सत्यनारायण पूजा'! देवावर विश्वास नसणाऱ्या डॉ. प्रकाशरावांनी आपल्या आईच्या इच्छेचा / भावनांचा मान ठेवुन सत्यनारायणपूजा केली, त्यावेळी आम्ही सर्व कुटुंबीय हेमलकसाला आलो होतो.

आपल्या श्रीकांतलाही तू वेळोवेळी व त्याच्या अखेरच्या काळात सांभाळलस आणि बहिणीचं कर्तव्य तू खंबीरपणे पार पाडलस!

दिवस कसे भराभर निघून जातात.... आताशा तुला फोटो किंवा टीव्ही वर पहाते तेव्हा तू अगदी आपल्या आईसारखी दिसायला लागली आहेत असे वाटून जाते, तुला बघून मला आईचीच आठवण येते.........

मंदा, तू व प्रकाशरावांनी तुमच्या क्षेत्रात खूप मोठं नाव कमावलं, तुम्हाला मोठमोठी अ‍ॅवॉर्ड मिळाली, खूप ठिकाणी तुमचा आदर सत्कार केला जातो अशावेळी तुम्हा दोघांना खूप अभिमान वाटतो व आनंद होतो!!

तुला असेच उत्तरोत्तर यश व उत्तम आरोग्य हया पुढेही मिळो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

कुंदाताई



आम्ही 'सिंदी'कर देशपांडे'! आई –वडील दोघेही शिक्षक! आम्ही तिघी बहिणी व मंदा सगळयात धाकटी! सर्वसाधारण, सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात पण संस्कारी वातावरणात आम्ही वाढलो. संघाचे संस्कार असलेले, उत्तम तत्वांचे स्वतः आचरण करणारे वडील आणि सोशिक कष्टाळू व त्या काळी एम. ए. मराठी झालेली माझी सुशिक्षित आई; हे आमचे आई–वडिलच आम्हा बहिणींसमोर आमचे आदर्श होते.

आमच्या नेहमीच्या आयुष्यातील रूळलेल्या पाऊलवाटां ऐवजी डॉ. मंदा ही अतिशय दुर्गम भागात जाऊन आदिवासी लोकांच्या वैद्यकीय सेवेची पाऊलवाट स्वीकारेल व पुढे असामान्य जीवन जगेल असे मात्र आम्हा कुणालाही त्यावेळी स्वप्नातही वाटले नव्हते!

अर्थात डॉ. प्रकाश शी तिची सेवाग्राम मेडीकल कॉलेजमध्ये भेट झाली आणि त्या दोघांनी लग्न करायचा निर्णय घेतल्याने मंदाचे आयुष्य पूर्णतः अंतर्बाहय बदलून गेले! दुर्गम आदिवासी भागात जाऊन वैद्यकिय सेवा देण्याचे काम करणे, तसेच आयुष्यभर सेवावृत्तीने राहाणे, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे हे वडिलांना जाणवल्याने त्यांना ''लग्नानंतर हिचं कसं होणार?'' अशी काळजी मात्र वाटली होती! पण मंदा आमच्या वडिलांसारखीच जिद्दी आणि आमच्या आईसारखी सोशिक असल्याने तिने डॉ. प्रकाशना परीपूर्ण साथ दिली आणि आदिवासी वैद्यकीय सेवेचे जे काम हाती घेतलं ते पूर्णतः झोकून देऊन पार पाडलं असं मला वाटतं!



मंदा लहानपणापासून आमच्या वडिलांप्रमाणे स्वभावाने जिद्दी होती. एकदा एखादी गोष्ट करायची ठरली की ठरली! त्यापासून ती तीळभरही मागे हटणार नाही, सर्वस्व पणाला लावून त्या गोष्टीची कास धरेल, आणि हाती घेतलेले काम पूर्ण करेल, असा तिचा स्वभाव लहानपणापासूनच आहे. ती शिस्तबद्ध आहे. स्वच्छता व टापटीप तिला आवडते. स्वभावतः ती काटकसरी आहे! लहानपणापासून स्वतःच्या गोष्टी स्वतः करणारी स्वयंपूर्ण मंदा मला आठवते. मंदाची स्तुती केली की ती संकोचून जाते. तिला तिचे कौतुक केलेले फारसे आवडत नाही, अशावेळी ती विषय बदलते हाही एक तिचा वैशिष्ठयपूर्ण स्वभावविशेष आहे.

मंदा स्वभानाने धाडसी आहे. कोणतीही नवीन गोष्ट शिकून घेण्याकडे व करण्याकडे तिचा कल असे. तिच्या तरूण वयात ती उत्तमरित्या स्कूटर चालवत असे हे आठवते. मंदा लग्नानंतर पोहायला शिकली! तिला साडी नेसून पोहताना मी पाहिलं आहे. प्रकाश, मंदा व त्यांनी वाढविलेले प्राण्यांचे गोकुळ यांना एकत्र पोहतानाचे अद्भुत दृश्य मी पाहिले आहे!



मंदाला तिच्या संसारी आयुष्यात सर्व माणसांची उत्तम साथ लाभली आहे! तिचे मुलगे–सुना ही पुढची पिढी पण प्रकल्पावर स्वेच्छेने आणि आनंदाने काम करीत आहे हे पाहून खूप आनंद होतो व समाधान ही वाटते. प्रकल्पावरील दवाखानाही आता अद्ययावत केलेला आहे.

अतिशय दुर्गम भागात, निर्जन ठिकाणी झोपडीत राहून, उघडयावरील दवाखान्यापासून सुरूवात करून आजच्या अद्ययावत हॉस्पिटल पर्यंतचा डॉ. मंदाच्या वैद्यकीय सेवेचा प्रवास अचंबित करणारा आहे.

आज हेमलकसाचा लोकबिरादरी प्रकल्प जागतिक उंचीवरील वैद्यकीयसेवा प्रकल्पांमधील एक म्हणून गौरविला जातो व हया सर्व कार्यामध्ये माझ्या धाकटया बहिणीचे मोठे योगदान आहे, याचा मला अभिमान वाटतो! मंदा, तुला तुझ्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्य खूप–खूप आशिर्वाद व तुला उत्तम आयुरारोग्य लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना!

तुझी,
डॉ.नंदा सुळे




परी अंतरी प्रीतीची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती
'सेवामयी मार्ग' हा 'ध्येय' आता
कळे तू पुढे आणि मी मागुती....
भटजी नाही
कुंडली पाहिली नाही
मराठवाड्यात दुष्काळ
म्हणून गोड (लाडू) नाही
रविवारचा मुहूर्त
देणं-घेणं नाही


नाहीस बोलली तू मीही न बोललो
मौनात आज गेले बरसून चांदणे !





‘देखणी ती पाऊले, जी ध्यासपंथे चालती
वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती.’





'गोरी गोरी पान, फूलासारखी छान..!!,
दादा मला एक वहिनी आण......'

हे गाणं मी अनुभवलं आहे, कारण प्रकाशभाऊने माझ्यासाठी अगदी हया गाण्यातल्या सारखीच वहिनी आणली! प्रथम भेटीतच मला वहिनी खूप आवडल्या, पण लक्षात आलं की वहिनी खूपच अबोल आहेत! पण हेही लक्षात आलं की, वहिनींच काम बोलतं!

वहिनी स्वभावाने शांत, अतिशय साधी, व्यवहार कुशल, दूरदृष्टीने विचार करणारी, व खूप कष्टाळू आहे. तिने प्रकल्पाच्या वैद्यकीय सेवेतील तिचे कार्य मोठया आत्मविश्वासाने व झोकून देऊन केले आहे. व आज वैद्यकीय सामाजिक कार्यातील ती एक जगप्रसिध्द उदाहरण बनली आहे. वहिनींचे बालपण, शिक्षण इ. सर्व नागपूर सारख्या मोठया शहरात झाले पण हेमलकसा सारख्या जंगलात प्रकल्पावर काम करण्यासाठी रूजू झाल्यावर त्या सहजी तिथल्याच एक बनून गेल्या! त्यांनी खाण्या–पिण्याची अथवा कोणत्याच गोष्टींची,कधीच कोणतीही तक्रार केली नाही.

वहिनी स्वत: उत्कृष्ठ स्वयपांक करतात, पण कम्युनिटी मेस मध्ये बनलेल्या पदार्थांना त्यांनी कधीही नावं ठेवली नाहीत. वहिनींची देवावर श्रध्दा आहे. हेमलकसा प्रकल्पावर आल्यापासून देवपूजे विना त्यांचा एकही दिवस गेलेला नाही. रोज देवाची पूजा झालीच पाहिजे असा तिचा कटाक्ष अजूनही असतो. पण तिच्या श्रध्देबाबत एक घेण्यासारखी गोष्ट म्हणजे तिचे धार्मिक आचरण तिने स्वत:पुरते मर्यादित ठेवले आहे. नवऱ्याला, मुलांना, सुनांना तिने कधीही हयाबाबत कोणतीच सूचना अथवा जबरदस्ती केलेली नाही.

वहिनींना सर्व सणवार साजरे करायला खूप आवडतात. प्रकल्प स्वयंपूर्ण झाल्यानंतर प्रकल्पावर सणवार साजरे केले जाऊ लागले. राखी पौर्णिमेला नारळी भात, दिवाळीला दिवाळीचा फराळ, पोळा, तान्हा पोळा साजरा करणं, होळीला पुरण पोळी, अगदी वसुबारसेला गाईचे पूजन आणि दहा दिवसांचा गणपती उत्सव अशाप्रकारे सर्व सण प्रकल्पावर आणि प्रकल्पाच्या कम्युनिटी मेस मध्ये ते ते पदार्थ तयार करून साजरे केले जातात.

सुरूवातीच्या काळात वहिनी स्वत: अतिशय सुबक गणपती तयार करायच्या व सुंदर रंगवायच्या........!! आता गणपती तयार करणे शाळेत मुलांनाही शिकविले जाते. गणपतीचे दहा दिवस संध्याकाळी चणे, उपमा, शिरा, सोजी, पोहे अशी काही ना काही वेगवेगळी खिरापत असते! सर्वच उत्सव प्रकल्पावर उत्साहात साजरे होतात ते केवळ वहिनींच्या पुढाकारामुळे! सणावाराला केलेले पक्वान्न किंवा विशिष्ठ पदार्थ प्रकल्पावरील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचले की नाही हे सौ वहिनी स्वत: जातीने लक्ष घालून पहात असते. केलेला पदार्थ सर्वांना मिळाला पाहिजे हा तिचा आग्रह असतो.

वहिनींच्या देवात आमच्या आईचे (कै साधनाताईंचेही) देव आहेत. वहिनींचे पुष्कळ देव आहेत, माझी पण देवावर श्रध्दा असल्याने रोज १० ते १२ छोटे मोठे फुलांचे हार मी वहिनींच्या देवांसाठी तयार करते. आणि प्रकल्पावरील मुलांनाही हया कामात सहभागी करून घेते. वहिनी रीतभात संभाळणाऱ्या आहेत. दरवर्षी न चुकता त्या मला भाऊबीजेच्या दिवशी 'साडी' देतात. पण स्वत: तिने साडया किंवा दागदागिन्यांचा हट्ट भाऊपाशी कधीही केलेला नाही, हे तिचे मोठेपण....

वहिनीची राहाणी टापटीप, नीटनेटकी पण अतिशय साधी आहे. जगभरातुन हया दोघांना बोलावणी येतात. व त्यानिमित्ताने वहिनी विविध देशात जाऊन आलेली आहे तरीही तिने भारतातील परंपरागत 'साडी' ही वेशभूषा कधीही सोडलेली नाही, हयाचे मला खूप कौतुक वाटते!!

आदिवासी बांधवांना अंगभर कपडे नाहीत म्हणून प्रकाश भाऊ हाफपॅन्ट– बनियन वर राहू लागले. कितीही थंडी असली तरी प्रकाशभाऊ स्वेटर घालत नाहीत. भाऊ स्वेटर घालत नाहीत म्हणून मंदावहिनींनी पण स्वेटर घालणे सोडून दिले. हेमलकशाला जंगल असल्याने प्रचंड थंडी असते, पण भाऊ–वहिनी दोघेही कधीही स्वेटर घालत नाहीत! शेकोटी पेटवून हात–पाय शेकुन घेतात पण स्वेटर/शाल वापरत नाहीत. पत्नीची पतिनिष्ठा म्हणतात ती हीच! जे आचरण पतीचे तेच पत्नीचे, म्हणूनच मंदावहिनी मला आदरणीय आहे व राहील!

अशा या आमच्या मंदावहिनींचे प्रकाशभाऊवर आणि प्रकल्पावर निरतिशय प्रेम आहे, वहिनी प्रकल्पावरील काम सोडून कधीही माहेरपणाला, गेलेल्या मला आठवत नाहीत. त्यांना प्रकल्पावरील कामाचा कधीही कंटाळा येत नाही, कधी बदल म्हणून, विश्रांती म्हणून त्या माहेरी गेलेल्या नाहीत. त्या हेमलकसा प्रकल्पावर प्रकाशभाऊंची जणू 'सावली' बनून राहिल्या आहेत.

वहिनी, तुम्हाला ७५ व्या वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा!

सौ. रेणूका मनोहर

मंदा मामी!!

हेमलकशाला असताना आमचं घर, हेमलकशाचा परिसर, नदी, शाळा, प्राणी आणि प्रकाश मामा–मंदा मामी चे घर हेच आमचे विश्व होतं!

तेव्हा प्रोजेक्ट वरच्या काही मुलांसोबत मी पण मामीकडे अभ्यासाला जायचे. गणित आणि इंग्रजी या विषयाचा अभ्यास मामी माझा घेत असे. मामीने मला पेंट आणि बारीक वाळूचा वापर करून ग्रीटिंग करायला शिकवले होते. हेमकशाला जेव्हा पहिल्यांदा शाळेतल्या मुलांसाठी ग्रीटिंग करणे सुरू केले तेव्हा मामीनेच आम्हाला वेगवेगळया प्रकारचे ग्रिटींग करायला शिकवले.

हेमलकसात आजही सगळे सणवार एकत्रं साजरे करण्याची पध्दत आहे. मामीच्या नेतृत्वात आजही हे सगळे सण उत्साहात साजरे होतात. हरतालिका पूजन, वटपौर्णिमा, दिवाळी, दसरा, गणपती, संक्रांत... हे सगळे सण मामी आम्हाला सोबत घेऊन करत असे. संक्रांतीला मामीच्या अंगणात सगळया मुलींना त्यांना उपयुक्त पडतील असे वाण दिल्या जायचे. मुलींसाठी या वाणांची खरेदी करणे, बायकांचे वाण, ही सगळी खरेदी मामी नागपूर ला जाऊन करत असे, तेही न कंटाळता. आदिवासी बायकांना कपडयांच्या बाबतीत या भागात अनेक दुकानदार लुबाडत असत. त्यांना योग्य दरात साडया घेता याव्या म्हणून मामी नागपूरला जाऊन या साडयांची पण खरेदी करत असे आणि कितीही वाजता कोणी बाई खरेदीला आली तरीही न कंटाळता मामी हे साडया विकण्याचे काम करत असे. अर्थात हे सगळं संस्थेच्या माध्यमातून होत असे.

उन्हाळयात मेस साठी एवढया मोठया प्रमाणात लोणचं घालण्यात मामीचा हात कोणीच धरू शकत नाही. मामा ने एवढया मोठया प्रमाणात कैऱ्या फोडून द्यायच्या आणि मामी ने लोणचं घालायचं यात इतक्या वर्षांनंतर ही खंड पडला नाहिये. आताही हेमलकशाहुन येतांना मी हक्काने मामी ने घातलेलं लोणचं घेऊन येत असते. दिवाळीचे चार दिवस हेमलकशात एकत्र नाश्ता–फराळ केला जातो. एवढया मोठया प्रमाणात दिवाळीच्या फराळाची तयारी करणे, संक्रांतीला सगळयांसाठी लाडू करणे, अशी कामे मामी आजही इतकी वर्षे तितक्याच उत्साहाने करते आहे.

आम्ही सुट्टयांमध्ये तर मामा–मामी च्या घरी पडीक असायचो, मामी च्या घराची रचना डबा एक्स्प्रेस या खेळासाठी एकदम आयडियल आहे. भरपूर दारं असणाऱ्या या घरात डबा उडवताना खूप मज्जा यायची. त्या वेळेला काही पेशंट मामीकडे तपासण्यासाठी घरी येत असत. आमच्या त्या गोंगाटात ही मामी शांतपणे पेशंट तपासत असे. आम्हाला कधीच मामीने खेळ बंद करा असे म्हटले नाही. मामी गावाला गेली की तिच्या या घरातील देवांची पूजा करायलाही मला खूप आवडायचे.

मामी उत्तम वाचक तर आहेच पण त्यासोबत उत्तम कलाकार ही आहे. मी स्वत: मामीला प्रकल्पातील गणपतीउत्सवात बसवण्याचा गणपती तयार करतांना पाहिले आहे. दवाखाना सांभाळून सगळया गोष्टींना ती वेळ देत असे.

उन्हाळयाच्या सुट्टीत ज्या दिवशी मामीला आमच्या सोबत नदी वर यायला मिळत असे त्यादिवशी हमखास नदीकाठी भजी तळण्याचा बेत केला जायचा.

भाजी घेण्याच्या बाबतीतही मामी अत्यंत चोखंदळ! हेमलकशाच्या मेस साठी लागणाऱ्या भाज्या आणण्यासाठी मी अनेक वेळा मामी सोबत भामरागडच्या बाजारात गेले आहे. चांगली भाजी योग्य भावात मिळेपर्यंत मामी चे समाधान होत नसे.

दहावीच्या उन्हाळयात मी मामा–मामी, आरती यांच्यासोबत नाशिक, पुणे, मुंबई, कसराबाद अशी मोठी ट्रिप केली होती. खूप मज्जा आली होती या ट्रिप मध्ये! मुळात मामा–मामी माझ्यासाठी कायमच कम्फर्ट झोन आहेत! अनेक वेळा मी मामा–मामी सोबत ट्रिपला जात असे.

मला आठवतं माझं लग्न अशोकवन ला होणार होतं. निघायच्या आधी मी मामीला नमस्कार करायला गेले त्यावेळी "तू आता येशील ते पाहुणी म्हणूनच!" असं म्हणत मामीने रडत मला घट्ट मिठी मारली होती. आजही ते आठवले की डोळयात पाणी येतं.

आजही मामा–मामी माझ्या पाठीशी आहेत याचा खूप अभिमान आहे. रिध्दी चे ही मामी ला खूप कौतुक आहे. खर तर बऱ्याच गोष्टी आहेत मामी संदर्भात लिहण्यासारख्या! मला ज्या भावाल्या त्या लिहण्याचा हा छोटासा प्रयत्न

पंचाहत्तर व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा मामी आणि खूप खूप प्रेम सुध्दा.....!!

मोक्षदा



'केले कुणास्तव ते किती, हे कधी ,मोजू नये!!

हया तत्वावर चालणारी माझी आई डॉ. मंदा आमटे! माझी आई पूर्णत: निरपेक्ष आहे. कोणाकडुन ही कौतुकाची थाप/पोचपावतीची अपेक्षा न ठेवता ती अवती – भवतीच्या सर्वांसाठी सर्व गोष्टी शांतचित्ताने व प्रसन्न मनाने करत असते! कुणाला मदत केल्याचे ती मान्य करत नाही. तिला हया तिच्या कर्तव्य करण्याबद्दल कधी हळूच विचारलं तर ती म्हणते, "मी कुणाकडून कोणतीच अपेक्षा ठेवत नाही!" अशी निरपेक्ष मनाने, निस्वार्थपणे, सर्वांसाठी झिजणारी आई आठवली तरी माझ्या डोळ्यात पाणी येते!

मी लहान असताना आईने स्वत: मला सांभाळलं! कधी कोणत्याही कार्यकर्त्याकडे मला सोपविले नाही. मला शेजारी टेबलवर बसवून ती पेशंट तपासायची! मी मोठी झाल्यावर आठवते की, आईने कधी मुलगा–मुलगी असा भेद केला नही. दादा, अनिकेत व मी सगळयांना सारखाच न्याय असायचा. मी 'मुलगी' आहे म्हणून मला अमुक एक गोष्ट आली पाहिजे अशा प्रकारे तिने कधीच संस्कार केले नाहीत. एवढे सारे पेशंट्स, दवाखाना, प्रकल्पावरील सर्व जबाबदाऱ्या हे सर्व बघताना तिने आम्हा मुलांवरही कधीच दुर्लक्ष केले नाही. आमच्या तिघासाठी आईचे कर्तव्य निभावताना ती कधीही कमी पडलेली नाही. फक्त आमच्यावरच नाही तर प्रकल्पावरील अनाथ मुलांवरही तिने तितकीच माया केली.

आमची आजी रहायला असली की तिला खीर आवडते म्हणून आई वेळात वेळ काढून रोज वेगवेगळी खीर आजीसाठी करून ठेवायची!

आईला स्वच्छता खूप प्रिय आहे! आजी (कै. साधना आमटे) तिला म्हणायची "मंदा, कायम तुझ्या हातात झाडू दिसतो!" अजुनही घरात कुठे जाळं दिसलं की आईच्या हातात झाडू येतोच!

आई स्वभावाने खूप "धीराची" आहे. प्रकल्पामध्ये काम करत असतांना आलेल्या वेगवेगळया अडचणींना, कठीण प्रसंगांना, संकटांना तोंड देताना आम्ही तिला कधी रडत असलेली पाहिलेलं नाही. वेगवेगळया प्रसंगामधुन आपण घडत असतो तेव्हा रडत न बसता आलेल्या प्रसंगातून 'शिकायच!' हे आम्हा मुलांना आई बाबांनी शिकवलं.! आई म्हणते की काम करत असतांना आलेल्या वेगवेळया अवघड परिस्थितीमधून ती पण गेली आहे व खंबीर झाली आहे.

अशीच माझी समजुत घालण्याचा कार्यक्रम जेव्हा मी नर्सिंग शिकायला नागपूरला हॉस्टेल वर रहात होते तेव्हा जवळ–जवळ सहा महिने आईने केला! होस्टेलवर मी रूळले नव्हते कारण रॅगिंग व्हायचे. त्या काळात हॉस्टेलवरून घरी फोन करायचा असेल तर फक्त १ मिनिट बोलण्यासाठी वेळ असे! त्यावेळी मी फक्त रडत असायची व " इथून मला घेऊन जा!" असे आईला सांगायची! त्यावेळी "अडचणी येतातच! पण आपण आपले ध्येय आणि प्रयत्न सोडायचे नसतात" असं फोन वर बोलून ती माझी समजूत काढत असे. दर रविवारी अनिकेत दादाला मला भेटायला पाठवून धीर देणे ही चालू होते! ६ महिन्यानंतर मी होस्टेलवर चांगल्या पध्दतीने रूळले आणि आईने नि:श्वास टाकला!

आई–वडिलांचे नाव न वापरता आम्ही तिघांनी आपल्या पायावर उभे रहावे अशी आईची कळकळ नेहमीच होती. म्हणूनच मग मी ही दीनानाथ मधल्या Interview मध्ये मी प्रकाश/मंदा आमटे यांची मुलगी आहे हे सांगणे कटाक्षाने टाळले आणि मला Interview चांगला झाल्याने तिथे नोकरी मिळाली!

आम्ही मुलांनी भावी आयुष्यात काय बनावे? याची कोणतीही जबरदस्ती आई–बाबांनी आमच्यावर केली नाही. तुम्हालाही आमच्या सारखे सामाजिक कार्य करायचे आहे म्हणून कधी लेक्चर दिले नाही आणि आग्रह ही केला नाही. आम्ही सर्वांनी आपापली कार्यक्षेत्र स्वत: निवडली! आम्ही तिघेही आई–बाबांना काम करताना लहानपणापासून बघत होतो आणि तेच संस्कार ठळकपणे आमच्यावर होत गेले. त्यामुळे दादा व अनिकेत यांनी स्वेच्छेने प्रकल्पावरच काम करणे पसंत केले, आणि मी पण नोकरी सोडून 'आस्था' नावाची छोटीशी निवासी सामाजिक संस्था सुरू केली आहे!

सुरूवातीला मी सामाजिक संस्था काढण्याला सौ. आईचा विरोध होता, तो ते काम करतांना येणाऱ्या अनंत अडचणीमुळे! सामाजिक कार्य करणे हे खूप कठीण काम आहे, त्या पायी तुझं तुझ्या Family कडे, तुझ्या छोटया मुलांकडे दुर्लक्ष व्हायला नको असा तिचा आग्रह होता. मग मी पण तिला सांगितले "तुझ्या सारखच मी घर आणि सामाजिक कार्य दोन्ही करीन! आई तूच माझा आदर्श आहेस! आणि मी निवासी सामाजिक संस्था काढायचा प्रयत्न तर करून बघते!"

आता माझी संस्था सुरू होऊन तीन वर्ष झाली. आई–बाबा येवढयातच माझ्या संस्थेत येऊन गेले. तेव्हा आईच्या डोळयात आनंदाने पाणी आले आणि मी संस्था सांभाळण्याचे काम नीट करीत असल्याबद्दल तिने समाधान व्यक्त केले.

आई सदैव कार्यरत असते. आंबा/लिंबाचं लोणचं मोठया प्रमाणात घालणं, नातवंडांना खाऊ घालणे, पुस्तक वाचणे, विणकाम, हे काहिना–काही सतत चालू असते. एवढं वय झालं तरी तिला आळस काय ते माहितच नाही! सणावाराच्या वेळी तर पहाटे ५:३० वाजता आंघोळ करून आई मेस मधील तयारी पहायला हजर असते.

आईची सेवावृत्ती प्रखर आहे आणि हया वयातही जागृत आहे. आत्ताच एक महिन्यापूर्वी मी खूप आजारी पडले होते. त्यावेळी माझी "नहंत बैमबा करणं मला इन्सुलीन देणं एवढंच नव्हे तर मला होणारी उल्टी साफ करणं ही सगळी सेवा माझी ७५ वर्षाची आई शांतपणे करत होती आणि हे अनुभवताना मला भरून यायचं! आईने तेव्हा मला समजावलं की काम करायचं तर आपली तब्येत आपण प्रथम सांभाळली पाहिजे. आमचा मामा त्याच्या शेवटच्या दिवसात आई कडेच रहायला होता. त्या वेळी त्याला शौच व लघवी वरचा ब्वदजतवस कमी झाल्याने शौचगृहात पोहोचायच्या आधीच मल–मूत्राने जमिन खराब व्हायची. त्यावेळी सर्व साफ सफाई आईने न कंटाळता केली आहे. त्याच्या बेडवरच्या चादरी बदलण्यापासून सर्व गोष्टी स्वत: करण्यात तिला कोणताही कमी पणा वाटत नसे! हे सर्व तिने ६ महिने सांभाळले.

आईबद्दल किती लिहू? कुठे थांबू ते कळत नाही! आई तू माझे प्रेरणास्थान आणि दैवत आहेस! आज मी जी काही आहे ती तुझ्यामुळेच! तुला ७५ व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा व नमस्कार!


तुझी लेक,
आरती





लोक बिरादरी प्रकल्पात सुरवाती पासून कार्यरत असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते





१९७३ ला हेमलकसा प्रकल्प सुरू झाल्यानंतर लगेचच तिथे काम करायला सोमनाथचे शिबीर झाल्या झाल्या मी हजर झालो. डॉ. प्रकाशभाऊ व डॉ. मंदावहिनी, रेणूकाताई, नागेश यांसह मी कामाला सुरूवात केली. मुख्यत: हेमलकसा प्रकल्प म्हटलं की, जिव्हाळयाने भरलेले जीवन आठवते! अत्यंत ध्येयवादी तारूण्यातील भारलेले दिवस! आपल्या व्यावहारीक जीवनातून दूर आदिवासी लोकांसाठी मनापासून केलेले काम आणि तेही आपल्यासारख्याच ध्येयाने प्रेरित झालेल्या सवंगडयांबरोबर! आमच्या टीमचे प्रमुख डॉ. प्रकाशभाऊ व डॉ. मंदावहिनी! हेमलकसा मुख्यत: आदिवासी वैद्यकीय सेवाकेंद्र होते. प्रकल्पावर असणाऱ्या डॉ. मंदाताई आमच्यासाठी कायमच 'मंदावहिनी' राहिल्या. आम्ही सर्वजण त्यांना कायम 'वहिनी' म्हणून हाक मारीत असू!

वहिनींचा स्वभाव अतिशय प्रेमळ, पूर्ण सहानुभूतीने दुसऱ्याचा विचार करण्याची वृत्ती, सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ती, एक घास सर्वांमध्ये वाटून खायची तयारी, हयामुळे हेमलकसाच्या कार्यकर्त्यांमधील आम्ही सर्व आमटे यांचे फॅमिली मेंबरच झालो! प्रकल्पावर येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे रूपांतर कौटुबिक सदस्यामध्येच व्हायचे! हयाला कारणीभूत भाऊ व सौ. वहिनींचा अतिशय उत्तम स्वभाव हे होते. भाऊ व वहिनी आत्मविश्वासने तासन् तास त्यांचे वैद्यकीय काम करीत असत. मेडीकल – सर्जिकल– ॲनेस्थेशिया – डिलिव्हरी करणे इ. सर्वच कामे वहिनींना करताना आम्ही सर्वांनी पाहिले आहे.

वहिनींच्या स्वभावाबद्दल सांगायचे झाले तर त्यांच्या कडे आप–पर भाव नाही त्यामुळे शाळेतील विद्यार्थी किंवा कार्यकर्ते कोणीही त्यांच्याकडे ट्रिटमेंट घ्यायला गेले तर त्यांना अत्यंत प्रेमाची / जिव्हाळयाची वागणूक सौ. वहिनींकडुन नेहमी मिळत असे.

कामातील बदल म्हणून रविवारी सर्वच जण डोंगरावर फिरायला जात असत. एकदा असेच डोंगरावर फिरायला गेलेल्या सर्वांवर आग्या मोहोळातील गांधिलमाशांचा अचानक हल्ला झाला, मी शेतीच्या कामामुळे प्रकल्पावरच होतो. गांधिलमाशांच्या तावडीत भाऊ, वहिनी, छोटा दिगंत, विलासभाऊ, रेणूकाताई, शाळेतील मुले सर्वच सापडली. त्यावेळी मी प्रकल्पावरील घोडा व बैलगाडी डोंगरावर पाठवून सर्वांना सुखरूप प्रकल्पावर आणल्याचे आठवते. पुढे दोन–तीन दिवस सर्वांच्या अंगातील घुसलेले काटे काढण्यात गेले. सर्वांचे चेहरे तसेच सर्व शरीर सुजून गेले होते. भाऊ वहिनींवर गुदरलेले मोठे संकट म्हणुन हा प्रसंग आठवतो! पण हया संकटातुन सर्व सुखरूप बाहेर पडले!

वहिनींच्या अतिशय प्रेमळ व सर्वसमावेशक स्वभावाची आठवण करून देणारा एक प्रसंग म्हणजे; माझ्या पत्नीला मानसिक रोग झाल्याने नागपूर येथे न्यावे लागले. डॉ. सावजींकडे तिची ट्रीटमेंट चालू झाली व त्याकरीता १५ दिवस मला नागपूरला रहावे लागले. त्यावेळी प्रकल्पावरचा कार्यकर्ता म्हणून मी अशोकवन इथे राहू शकलो असतो पण माझ्या पत्नीसह माझी रहाण्या, जेवणाची सोय सौ. मंदावहिनींनी स्वत:च्या माहेरी (गिरीपेठ) येथे केली. १५ दिवसात मी जणु देशपांडयांच्या घरचाच होऊन गेलो. त्या १५ दिवसात वहिनींच्या माहेरच्या कुटुंबियानी मला व पत्नीला पूर्णत: त्यांच्या कुटुंबात सामावुन घेतले! माझ्या पत्नीला १ दिवसआड शॉकट्रिटमेंट घ्यावी लागत असे. आमच्या काळजीपोटी हेमलकसाहुन नागपूर ला वहिनी मध्येच येऊन जात असत व स्वत: आम्हा दोघांच्या मागोमाग डॉ. सावजी यांच्या दवाखान्यात पोहोचुन सर्व ट्रीटमेंट नीट चालू आहे ना हे बघत असत.

इतका जिव्हाळा मी वहिनीकडुन व त्यांच्या माहेरच्या कुटुंबाकडुन अनुभवला आहे! की मी तो आयुष्यात कधीही विसरू शकत नाही. डॉ. सौ. मंदावहिनींचे आचरण खरोखरच शुध्द आहे.!

संत तुकारामांच्या अभंगगाथेतील अभंग क्रमांक ३७४ मध्ये म्हटले आहे की,

''जाणे भक्तिचा जिव्हाळा
तूचि दैवाचा पुतळा
तुका म्हणे नवविध
भक्ति जाणे तोचि शुध्द........॥

हया ओळींमध्ये लिहिल्याप्रमाणे नवविधा भक्ति जिने जाणली आहे आणि तिच्या कामात ती नित्य आचरत असते, ती आमची शुध्द आचरणाची मंदावहिनी, तिचे प्रकल्पाच्या कामातील योगदान 'नवविधा भक्तिमय' आहे असे मी मानतो. म्हणूनच समाजसेवेतील पुरस्कार रूपी विठ्ठल तुम्हाला नेहमीच प्रसन्न राहिल! वहिनी, तुम्हाला तुमच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या मनापासुन शुभेच्छा!

........................................................................ दादा पांचाळ....

(श्री. गोविंद नामदेव पांचाळ.)
माजी मुख्याध्यापक, लोकबिरादरी प्रकल्प विद्यालय
(मधुकर भाकरे प्रतिष्ठानचा आदर्शशिक्षक पुरस्कार विजेते, सन २०१५)



आमच्या मंदावहिनींबद्दल काय बोलायचं? साखर किती गोड असते ते खाल्यावर कळते, तसे मंदाताई किती प्रेमळ आहेत ते त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाने अनुभवले आहे.

मंदावहिनींचा स्वभाव सर्वांना जोडणारा आहे. सर्वांना सामावून घेणे, सर्वांना मदत करणे, सगळयाच्या सुखदु:खात मदत करणे, आजारी कार्यकर्त्यांची स्वत: जावून विचारपूस करणे, त्याला हवं–नको ते बघणे, हे सर्व त्यांनी नेहमीच केले. प्रकल्पातील प्रत्येक कार्यकर्ता आपल्या कुटुंबापासून इतका लांब आणि जंगलात रहात असताना कधी घरच्या माणसांची आठवण येऊ शकत होती, पण मंदावहिनींचा प्रत्येक कार्यकर्त्यांप्रति एवढा जिव्हाळा असायचा की त्यांनी कधी घरच्या नातेवाईकांची आठवण येऊ दिली नाही. मंदावहिनींनी कार्यकर्त्यांना कधीही परकं मानलं नाही. एकत्र कुटुंबात जसे लहानभाऊ / मोठाभाऊ असतात तशीच वागणूक आम्हा सर्वांना दिली. आम्हाला कधीही परकं मानलं नाही. आम्हाला कुणालाही वाटलं नाही की आम्ही बाहेरचे आहोत.

डॉ. मंदावहिनीचा मोठेपणा म्हणजे एवढया उच्चशिक्षित डॉक्टर असूनही त्या प्रकाश भाऊ बरोबर घनदाट जंगलात आनंदाने राहिल्या. एक–दोन नव्हे तर जवळ जवळ वीस वर्षे हेमलकसा प्रकल्पावर वीज नव्हती, पंखे नव्हते, पक्के संडास–बाथरूम नव्हते. अशा प्रकारे कोणत्याही सुखसुविधा नसतांना, सर्व गैरसोयी ॲडजस्ट करून त्या विनातक्रार रहात होत्या. त्यांचा हा स्वभाव पाहून आम्हा बाकीच्या कार्यकर्त्यांनाही नकळत प्रेरणा मिळत असे की, शहरात वाढलेली, उच्चशिक्षित स्त्री जर सर्व गैरसोयी स्वीकारून राहू शकते तर आम्हीपण त्या स्वीकारायला काय हरकत आहे?

हेमलकसा येथील प्रकल्पावर पहिली काही वर्षे परिचारिका किंवा वैद्यकीय सहाय्यक कोणीही नव्हते. तेव्हा मंदावहिनींच्या मार्गदर्शनाखाली सिरिंजेस उकळणे, ड्रेसिंगचे साहित्य तयार करणे इ. कामे केली जायची. रोजचे १००–१५० पेशंट तपासून शिवाय वेळी अवेळी आलेल्या पेशंटना, प्रसंगी रात्री कंदिलाच्या प्रकाशात तपासणे हे सर्व मंदावहिनी अतिशय आनंदाने व शांतपणे करीत असत.

मंदावहिनींचा सहभाग वैद्यकेतर सर्व कामात पण असायचा. मी डॉक्टर आहे म्हणून त्या फक्त वैद्यकीय कामांना कधीच चिकटून राहिल्या नाहीत. गाईचे दूध काढण्यापासून सर्व कामे त्या आवडीने करत असत. रसोडयातील रोजचा नाश्ता, भाजी यांचे प्लॅनिंग करणे, हळद, तिखट इ. स्वयंपाकाच्या सामुग्रीचा स्टॉक चेक करणे हे देखील त्या करायच्या. प्रकल्पावरील हर तऱ्हेच्या कामात त्यांचा सहभाग असायचा. मी डॉक्टर आहे आणि तुम्ही कार्यकर्ते असं त्यांनी वागण्यातून कधीही दाखवलं नाही.

सौ. मंदावाहिनींचे जीवन खरोखरच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे असे मला वाटते.

सौ. मंदावहिनींना त्यांच्या पंच्यात्तराव्या वाढदिवसानिमित्त मनापासून शुभेच्छा।

.............................................. श्री. जगन मचकले.
नागेपल्ली



मंदा वहिनींच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त
त्यांना हार्दिक शुभेच्छा ! त्यांना उत्तम आरोग्य
व दीर्घायुष्य लाभो ही मनोकामना !

.............................................. श्री. गोपाळ फडणीस
माजी मुख्याध्यापक, लोकबिरादरी प्रकल्प विद्यालय



जवळ—जवळ ५० वर्षा पूर्वीच्या मंदाताई मला आठवतात! मी हेमलकसा प्रकल्पावर पहिली दोन वर्षे होतो! अगदी सुरूवात झाल्यावर जी पाच माणसं होती त्यातला मी एक! प्रकल्प नुकताच सुरू झाल्याने आम्ही सर्व जण पडेल ते काम करायचो पण त्यात अतिशय आनंद होता.

त्यावेळी मंदा व प्रकाश यांचा नुकताच विवाह झाला होता. त्यामुळे शहरात वाढलेल्या डॉ. मंदाताई हया घनदाट जंगलात काम करायला आल्याबद्दल मला नेहमी त्यांच कौतुक वाटायचं! डॉ. मंदाताई स्वभावाने अतिशय शांत पण 'निश्चयी' होत्या. त्या त्यांचे काम चोख करत असत व इतर कुणाच्या कामात ढवळाढवळ करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांना ड्रॉइंगची आवड होती असे आठवते. प्रकल्पावरील वैद्यकीय जबाबदारीसह मंदाताई इतर सर्व कामांमध्ये पण भाग घेत असत. प्रकल्पावर आलेल्या पाहुण्यांची ऊठ—बस करणे हेही त्या आवडीने करीत असत. मंदाताईंचे बोलणे फारच कमी! पण कुठल्याही विषयावर फापटपसारा न मांडता अगदी नेमकं व मुद्देसूद असं एखादच वाक्य त्या बोलायच्या!

प्रकल्पावरच्या सगळयांचे वाढदिवस लक्षात ठेवणे व त्यांना शुभेच्छा देणे हा मंदाताईंचा अजुन एक स्वभावविशेष आठवतो! त्यांना स्वयंपाकाची पण आवड असल्याने केव्हातरी तरी स्वत: त्या एखादा पदार्थ करून सगळयांना खाऊ घालायच्या. अगदी सुरूवातीला प्रकल्पावर बांधलेली प्रकाश मंदाची बांबू माती च्या भिंती व गवताचे छप्पर असलेली झोपडी व त्याच्या शेजारी मंदाताईनी लावलेली छोटीशी बाग आठवते. प्रकाशच्या काही प्राणी व पक्षांना मंदाताईंनी रोज खाऊ घालून त्यांची निगराणी ठेवत असे हेही आठवते!

दर रविवारी संध्याकाळी आम्ही आजुबाजूच्या भागात फिरायला जायचो! एकदा तिकडून परतताना काही आदिवासी अडलेल्या बाळंतिणीची सुटका करताना दिसले! त्यांनी बाळंतिणीला घराच्या एका कोपऱ्याला धरून उकीडवे बसविले होते व बाळ पोटातून बाहेर यावे म्हणून पोटाला दोरखंड बांधले होते ते पाहून लगेच सौ. मंदाताई त्यांच्याकडे गेल्या, त्यांनी त्या बाईच्या नातेवाईकांचा विश्वास संपादन करून त्या बाईला प्रकल्पावर आणले व प्रकल्पावरील दवाखान्यात तिची सुखरूप सुटका केली! अवघड/अडलेली डिलीव्हरी करून बाळ—बाळंतीणीला सुखरूप ठेवले!

अशा हया आमच्या मंदाताई! जणू सर्व आदिवासी बांधवांच्या आई!

.................................... श्री. नागेश हटकर
मुंबई



मी १९८४ पासून डॉ. मंदाताई सोबत दवाखान्यात काम करतो आहे. पूर्वी दवाखाना चौवीस तास चालू असायचा. चौवीस तास पेशंट कधीही येत असत.पण आमच्या मंदा वहिनींना कंटाळा व चिडचिड हे शब्द माहिती नाहीयेत. त्यामुळे त्या कोणत्याही वेळी शांतपणे पेशंट तपासायच्या! पेशंट संपल्यानंतर जेवणाच्या वेळेनंतर वहिनींची स्वस्त साडया वाटप योजना सुरू असायची आदीवासी लोकांसाठी त्या नागपूरहुन स्वस्त साडया आणायच्या व इथे त्याचे वितरण करायच्या. आम्ही वहिनींना सतत कामातच बघितलं! त्यांना कामात बघितल्यामुळे आम्ही पण वेगवेगळया कामात बिझी रहायचो.

सुरूवातीच्या काळात प्रकल्पाला कोणतीही ग्रँट नव्हती त्यामुळे स्टराईल गॉझपिस, पॅड इ. च्या वापराबाबत मंदावहिनी काटकसरी होत्या. पेशंटला जरूरी असेल तेवढे सामान वापरायचेच पण ते काटेकोरपणे वापरावे असा त्यांचा उद्देश असे. दुसरे म्हणते स्वच्छता. सर्जिकल कॅम्पच्या पूर्वी ऑपरेशन थिएटर मधील स्वच्छता करण्याच्या वेळी त्या स्वत: आमच्यासोबत स्वच्छता करत असत; कोपऱ्यात, दाराच्या छोटयाश्या फटीत जाळी असेल तर प्रसंगी केसाची पिन काढूनही सांदी कोपऱ्यातील स्वच्छता करताना आम्ही त्यांना पाहिले आहे.

वहिनींनी घरात व दवाखान्यात दोन्हीकडे सारखा न्याय दिला. त्यांचे दोन्हीकडे सारखेच लक्ष असायचे. व दोन्ही ठिकाणची कामं त्या तितक्याच तत्परतेने करत असत. उदाहरण म्हणजे सकाळी त्यांची देवपूजा चालू असतांना पेशंट आल्यास त्या प्रथम पेशंट पहात असत, पण समजा पेशंट पहाताना दुपारचे दोन जरी वाजले तरी त्या पेशंट संपल्यावर घरी जाऊन प्रथम राहिलेली पूजा पूर्ण करत असत. घरात व दवाखान्यात दोन्हीकडे त्यांचे पूर्ण कक्ष असायचे.

वहिनी कधीही आम्हा सर्व हॉस्पिटल स्टाफशी बोलताना अधिकार वाणीने बोलल्या नाहीत. त्याकधी अधिकाराने काम करून घेत नसत, मी डॉक्टर आहे व तुम्ही स्टाफ अशा भावनेने त्या कधीच वागल्या नाहीत. गॉझपिस, पॅड, बॅंडेज कसे बनवायचे हया सगळया गोष्टी आम्हाला मंदावहिनींनी शिकविल्या. त्या स्वत: हे सर्व करून दाखवायच्या. त्यांनी कधी आम्हाला भाषण देऊन शिकविलं नाही. मी खरेतर नॉन मेडीकल स्टाफ मी सुरूवातीला लॅब मध्ये काम करत असे. पण हळुहळू बीपी पहाणे, सिरीयस पेशंट तपासणे, इमर्जन्सी ट्रीटमेंट, ऑपरेशन थिअेटर मधील मदत व प्रत्यक्ष ऑपरेशनच्या वेळी मदतनीस बनणे हे सर्व वहिनींनीच मला शिकविलं आहे.

सोप्या भाषेत, सोप्या पध्दतीने सर्व गोष्टी स्वत: करून दाखवून व त्यानंतर त्या आमच्या कडून त्या करवून घेऊन वहिनींना आम्हाला ट्रेन केलं! आज मला जे काही येतं त्याला कारणीभूत वहिनी आहेत. वहिनींना वाढदिवसाच्या शुभेच्छा व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

................................................................ बबन पांचाळ



श्रृंखला पायी असू दे मी गतीचे गीत गाईन.
....बाबांच्या या अजरामर कवितेतील ओळीं प्रमाणे जीवन आपसुकच पूर्णत्वाकडे जात असतांना लोक बिरादरी प्रकल्पाच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त मला या माध्यमातून व्यक्त होण्याची संधी मिळते आहे. त्याबद्दल मला खूप आनंद वाटतो.

खर तर मला ज्यांच्या बद्दल मनोगत व्यक्त करा असे सांगण्यात आले. ते ऐकून मी क्षणभर स्तंभित झालो! मी काय बोलावं याचाच मला अंदाज येत नाहीये. मी माझं प्रांजळ मत व्यक्त करतो आहे किंवा अभिप्राय नोंदवत आहे किंवा स्वानुभव सांगत आहे की आजतागायत जीवनाचा सारीपाट नमूद करत आहे? असे नाना विविध विचारवलयांचे तरंग मनात निर्माण झाले. आणि खऱ्या अर्थाने मनोगत म्हणजे नेमके काय याची उकल झाली. माझ्या मते मनोगत म्हणजे एखादया व्यक्तीबद्दल आपल्या मनात अगत्याने असणारे स्वच्छ भाव.

सौ. डॉ. मंदाकिनी प्रकाश आमटे म्हणजे आमच्या वहिनी! त्या मला मातृतुल्य आहेत. वहिनींकडून नेमके काय मिळाले किंवा त्यांनी नकळतपणे काय दिले असं सांगायचं झालं तर सहनशीलता जी मला योग्य वयात व सुयोग्य रीतीने मिळाली. मी संस्थेत काम सुरू केल्यापासून एक अनामिक ओढीने संस्थेच्या कामात विरघळत गेलो ते वहिनींचे कार्य पाहूनच. बाहेरची परिस्थिती प्रतिकूल असताना मनाची स्थिती अनुकूल कशी राखावी याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे वहिनी! आपल्याकडे असलेली विद्वत्ता आणि समोरच्या व्यक्तीची गरज यांचा मेळ घालण्याचे कसब वहिनींच्या ठायी मी अनेकदा अनुभवले आहे. मी रूग्णालयात कार्यरत असतांना एखादं क्लिष्ट काम हे अगदीच सहजपणे कसं करावं याचे धडे मी गिरवले ते केवळ वहिनीं मुळेच आणि त्या सवयीने माझ्या मध्ये एक परिपूर्ण माणूस घडत गेला. वहिनीं कडून शिकलेल्या गोष्टींचा उपयोग संस्थेत इतरत्रही फार मोलाचा ठरला. ज्ञानेश्वरीत म्हंटल्याप्रमाणे ''मार्तंड जे तापहीन, ते सर्वाही सदा सज्जन'' अगदी तोच आभास मला वहिनीं संदर्भात जाणवतो. त्यांच्या उमटलेल्या पाऊल खुणांच्या आसपास जरी सरते शेवटी जाता आले तरी या जीवनाचं 'दान पावलं' असं मी मानतो.

.................................................. मनोहर येम्पलवार



मंदावहिनी, साधारण १९७५ साली मी तुम्हाला पहिल्यांदा पाहिलं असेल. कारण २७ ऑक्टोबर १९७४ ला हेमलकशाला जगन च्या नेतृत्वाखाली नागेपल्ली हून पायी पायी आलेल्या 'साहसायनात' मी प्रथम आलो. तेव्हा प्रकाश, रेणुका, अजित, आणि नागेश तेथे होते. तुम्ही नागपूरला कॉलेज मध्ये शिकवत होता. मी तुमच्याविषयी रेणुकाकडून खूप ऐकले होते. म्हणजे तुमच्या लग्नात धान्यांच्या काढलेल्या रांगोळ्या, खूप साधेपणाने साजरा झालेला तुमचा लग्न समारंभ, तुमचा अबोल स्वभाव इ इ. तुमचे काही एनलार्ज केलेले ब्लॅक अँड व्हाईट फोटो पाहिले होते. अतिशय सुंदर हसरे फोटो होते ते. अर्थात नागेश सारखा प्रोफेशनल फोटोग्राफर असल्यावर काय.....

अर्थात ही अगदी पहिली आठवण. पण जेव्हा आपण प्रत्यक्ष भेटलो तेव्हापासून तर आत्ता पर्यंत तुमची प्रतिमा माझ्या मनातली आजही तीच आहे. अत्यंत साधेपणा! आणि जोडीला स्वभावातला मितभाषीपणा! तुमच्या अबोलपणामुळे तुमचा साधेपणा अधिकच खुलतो. तुम्हाला तुम्ही एक एम.बी.बी.एस. असल्याचा अभिमान किंवा गर्व मला कधीच दिसला नाही. तुमच्या व्यक्तिमत्वात रुबाब किंवा 'मी' पणा हा मला कधीच दिसला नाही. तुमच्यात दुसऱ्यावर सत्ता गाजवण्याची वृत्ती कधीच नव्हती. इतकच काय पण नवऱ्यावर तरी कधी तुम्ही सत्ता गाजवली असेल की नाही या बद्दल पण माझ्या मनात शंका आहे. कारण मी कधीच तुमच्या दोघात कडाक्याचं भांडण वा वाद झाल्याचं पाहिलं किंवा ऐकलं नाही.

तर प्रसंग १९७६ चा. बाबांच्या सांगण्यावरून मी आणि रेणुकाने आपली हेमलकशाची अनौपचारिक शिक्षणाची शाळा सुरु केली होती. मी अचानक आपल्या कार्यकर्त्यांच्या किचन मध्ये न जेवता शाळेच्या किचनमध्ये जेवायचा निर्णय घेतला. बाबा आल्यावर त्यांनी माझ्या निर्णयाचं कौतुक केलं पण प्रकृती चांगली रहावी म्हणून रोज दूध घ्यायला सांगितलं. मी नको म्हटलं पण बाबांनी मला आठवणीने रोज दूध देण्याची जबाबदारी तुमच्यावर टाकली होती. आणि मी जिथे असेल तिथून तुम्ही मला त्या वेळी बोलावून घेत आणि काळजी ने मला ते दूध देत असत. मला खरंच या गोष्टीचं खूप कौतुक आजही वाटतं. तुम्ही फार बोलत नसायच्या पण कृतीने मात्र व्यक्त होत होत्या.

दुसरा प्रसंग आहे नागपंचमीचा. तुम्ही धार्मिक आणि संस्कृतीप्रिय होत्या. त्या दिवशी तुम्ही, रेणुका, शांताबाई अशा सगळ्याजणी नागाची पूजा करत होत्या. तेथे तुम्हाला मी म्हणालो 'काय तुम्ही इतक्या शिकल्या तरीपण नागाची पूजा करता! नागात काय देव असतो का?' 'त्यावर तुम्ही मला ताडकन उत्तर दिले होते. 'ही आमची श्रद्धा आहे त्याचा अपमान करण्याचा तुला काही अधिकार नाही' तुमचं म्हणणं बरोबरच होतं. तेव्हापासून मात्र मी शिकलो. आणि कधीच कुणाच्या श्रद्धेवर शंका व्यक्त केली नाही. तुम्ही अबोल असलात तरी रास्त ठिकाणी स्पष्ट बोलणं हे तुमचं वैशिष्टय होतं.

आणखी एक प्रसंग म्हणजे शाळेतल्या मुलांना आपल्या आईवडिलांची लंगोटी घातलेले म्हणून लाज वाटू नये या साठी मी शाळेत आठवड्यतून दोन दिवस लंगोटी हा युनिफॉर्म केला होता. आणि शिक्षकांनी पण लंगोटी घातली पाहिजे असं ठरवलं. मी आणि अशोक ताकमोगे लंगोटी घालत होतो. पण लंगोटी घालून मला सगळीकडे जावं लागायचं. आता हा माझाच निर्णय असल्यामुळे मला लंगोटी घालून फिरण्यात फारसं काही वाटत नव्हतं. पण प्रकल्पावर च्या काही महिलांना आणि तुम्हाला पण ऑकवर्ड वाटत होतं. तेव्हा पण तुम्ही पोलाईटली मला सांगितलं होतं की प्लिज लंगोटी घालून तू इकडे येत जाऊ नकोस आणि मी पण ते पाळलं होतं. काही गोष्टी बोलायची प्रकाशला भीड पडत असायची, पण तुम्ही मात्र अशा भिडस्त नव्हत्या आणि नाहीत.

हेमलकशाला आम्ही दहा बारा जण कार्यकर्ते होतो पण तिथे हेअर कटिंग करायला कुणीच कारागीर नसायचा. आणि एक दिवस प्रकाश म्हणाला मीच सगळ्यांची कटिंग करतो. पण कटिंग म्हणजे काय? तर चक्क टक्कल करायचं आणि पावसाळ्यात कुणी पाहुणे पण येत नसायचे. म्हणून आमच्या सर्वांचे टक्कल प्रकाशच करत असायचा. पण या गोष्टीला तुम्ही कधीच विरोध केला नाही. उलट प्रकाशची कटिंग करायला तुम्ही मदत करीत असायच्या.

१९७६ पावसाळ्यातली गोष्ट आहे. आपण सर्व बेजूर पहाडावर सहलीला गेलो होतो. तिथे अचानक झालेल्या मधमाश्यांच्या हल्ल्यामुळे आपली पळताभुई थोडी झाली. खूप माशा चावल्या. पुरुषांच्या डोक्यावर अजिबात केस नव्हते त्यामुळे माशा अधिकच चावल्या. तुम्ही पण काही वेळ धावत होत्या. प्रकाश तुमच्या बरोबरच होता. शेवटी तुम्ही दमल्या आणि तुमच्या कडून पायी चालणं पण शक्य होत नव्हतं. जो तो आपला जीव वाचवण्याच्या फिकीरीत होता. शाळेची मुलं आदिवासी असल्यामुळे धूम पळत सुटले. मी ही पळत होतो पण मला इतक्यात तुम्ही बसलेल्या दिसल्या. मी प्रकाश ला म्हटलं 'प्रकाश, काय रे? तर तो म्हणाला, ''मी मंदाला टाकून येऊ शकत नाही! आता मेलो तर आम्ही दोघे इथेच मरू!" मला काय करावं सुचेना. पिलू लहान होता. कल्याण त्याला कडेवर घेऊन सुरक्षित जागी धावत होता. आम्ही सगळे डोंगराच्या खाली कसे बसे पोहोचलो. सगळेजण माशांच्या डंखा मुळे सुजलेले होते. विलासने प्रसंगावधान दाखवून हेमलकशाला जाऊन तिथे पोहोचल्यावर सुद्धा तुम्ही आणि प्रकाश स्वत: सुजलेले पेशंट असूनही लगेच डॉक्टरच्या भूमिकेत गेला आणि आम्हा सर्वांना इंजेक्शन, गोळ्या देऊन खाटांवर झोपवलं! आणि सगळ्यांची काळजी घेत फिरू लागल्या! माय गॉड! हे किती कठीण आणि धैर्याचं काम होतं! या ठिकाणी तुम्ही प्रकाश पेक्षा एक कणानेही मागे नव्हत्या. मला तो सर्व प्रसंग ताजा असावा असा आठवत आहे. धन्य आहे तुमची आणि प्रकाशची!

सास भी कभी बहू थी हे म्हणणं तुम्ही त्या काळात खोटं ठरवलं होतं. तुमचं आणि साधनाताईचं मेतकूट इतकं कसं काय जमलं होतं हो? खरंच हे माझ्यासाठी आणि माझ्यासारख्या अजून काहीजणांसाठी आजही कोडंच आहे. दोन भावांमध्ये, दोन बहिणी असो की दोन मित्र असो अगदी नवरा बायको असो त्यांच्यात पण मतभेद आणि वाद असतात पण मग तुमच्यात कसे नव्हते? म्हणजे माझ्या खोडकर स्वभावानुसार तुमच्या दोघीत गंमतीने एकदा मी चुगली करायचा प्रयत्न केला होता तर ताई रागाने म्हणाल्या ''तू मंदाबद्दल असं कसं म्हणू शकतोस?" जास्त वाढवा होण्याच्या आत मी माफी मागून आवरतं घेतलं! नाही तर फार महागात पडलं असतं मला! पण वहिनी, तुमची स्तुती करतांना साधनाताईंना कधीच थकवा येत नव्हता. ताई अनेकवेळा आनंदवनहून काही वस्तू तर कधी खाऊ सगळ्यांसाठी पाठवीत असायच्या. त्यातला वासंतीचा आणि माझा हिस्सा प्रत्येकवेळी तुम्ही लाहिरी पर्यंत न चुकता पोहोचविला होता. संक्रांतीचं वाण असो, मला आवडणारा कोहळा असो की मी हेमलकशाच्या मुक्कामात तिथे विसरून गेलेली एखादी वस्तू असो तुम्ही ती काळजीपूर्वक लाहिरीला पोहचती केली आहे हे मी आणि वासंती विसरूच शकत नाही.

पण वहिनी, तुम्ही वासंतीला जरा झुकतंच माप दिलं! मला फक्त मालेगाव च्या सत्कारात एक खादीचा ड्रेस दिला होता आणि तिला मात्र कितीतरी साडया! पण ते जाऊ द्या. तुम्ही दिलेल्या ड्रेसला कुणी छान म्हटलं तर लगेच सांगतो की 'मग! मंदा वहिनींनी दिलेला आहे!' त्यामुळे माझी कॉलर ताठ होते हो! तसचं तुम्ही वासंतीसाठी नागपूरहून आणलेल्या स्टीलच्या दोन चहाच्या गाळण्या आणि सहा काचेच्या डिश मधल्या काही डिश अजूनही वासंतीने तुमची आठवण म्हणून जपून ठेवल्या आहेत आणि त्या वापरतेही. तुम्हाला माहिती पण नसेल वहिनी, की अशा कितीतरी आठवणी तुम्ही कितीतरी लोकांच्या मनात ठेवलेल्या आहेत!

तुमच्या एकदा लक्षात आलं की माडिया गोंड महिलांची साड्या व इतर कपडे खरेदी करतांना बऱ्यापैकी लूट होते. त्यांना फसवलं जातंय. आणि तुम्ही ठरवलं की आपण या आदिवासी महिलांना वाजवी भावात (नो लॉस नो प्रॉफिट दरात) कपडे द्यायचे. आणि केला तो सगळा उपद्व्याप! पण तुम्हाला माहित आहे की त्याचा फायदा फक्त आदिवासींनाच नाही तर आपल्या सर्व कार्यकर्त्यांना पण झाला. तुमच्या या छोट्याशा दुकानात किती लांबून बायका येत होत्या!

एकदा मी नाशिकच्या वर्तमानपत्रात वाचलं होतं की तुम्ही भामरागड च्या आदिवासी महिलांच्या सांगण्यावरून त्यांना घेऊन दारूच्या दुकानावर मोर्चा पण काढला होता. खरंतर हा तुमचा स्वभाव नाही पण गरज पडली तर तुम्ही स्वत:ला मोल्ड करू शकता हेच तुम्ही सिद्ध केलं!

आज तुमच्या या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या, जन्मदिवसाच्या निमित्ताने तुमच्या अनेक छोट्या–मोठया गोष्टी आठवत आहेत! म्हणजे बघा, आता इतके प्राणी प्रकाशने पाळले आणि नुसते पाळले नाही तर ते घरात पाळले! ते सगळे प्राणी प्रकाशला चाटत, त्याच्या अंगा खांद्यावर खेळत! पाच सात कुत्र्यांचे खाणे पिणे पण तुमच्याच घरात होत होते. याचा सुरुवातीला काय कमी त्रास होता! सवय नसतांना तुम्हाला त्यांचा वास सहन करणं त्या काळी फार कठीण होत असलं पाहिजे असं मला आता वाटतं! प्रकाशचं वाघ–सिंहासाठी प्राणी कापून त्यांचं मांस फ्रीझ मध्ये ठेवणं हे तुमच्या सारख्या शाकाहारी गृहिणीला सहन करणं कसं शक्य झालं असेल याची कल्पना शहरी लोकांना येणं कठीण आहे. पण त्याची तुम्ही कधीच तक्रार केल्याचं मला आठवत नाही. बाहेरून पाहणाऱ्यांना ते फार रोमँटिक वाटतं पण मंदावहिनी त्यावेळी तुम्ही सर्व गोष्टींचा शांतपणे केलेला स्वीकार म्हणजे माझ्या दृष्टीने ती एक साधना, एक तपश्चर्याच होती. इतकच नाही तर प्रकाश जेव्हा बिबट्याला की सिंहाला आपल्या हाताने मांस खाऊ घालत असतांना त्याची बोटं सिंहाकडून चावली गेली आणि त्याच्या हाताला टाके पडले तेव्हा तुम्हाला काहीच वाटले नसेल का? आणि काही वर्षापूर्वी प्रकाश एका घोणस जातीच्या सापाला हाताळत असतांना अपघाताने त्या सापाने प्रकाशला डंख मारला त्यावेळची तुमची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाच करवत नाही! कितीतरी दिवस प्रकाश आय.सी.यू. त होता. त्याचे सारखे तळ्यात–मळ्यात च चालले होते. मी ते सर्व फोन वर विचारून आणि वर्तमानपत्रातूनच समजून घेत होतो. तुमच्या सहनशक्तीची पूर्ण कसोटी होती ती!

सोनं जसं अग्नितून तावून सुलाखून शुद्ध होतं तसच तुमचं झालं अशीच माझी भावना आहे. या क्षणी मी फार भावुक झालो आहे. मला अजून पुष्कळ लिहायचं होतं पण थांबतो इथेच!

तुम्ही अनु, पिलू, आरती, अनघा, समीक्षा सहित आम्हा सर्वांना खूप प्रेम, माया, आपुलकी देत आयुष्याची शंभरी गाठावी आणि प्रकाशने तुम्हाला तेवढीच साथ द्यावी अशी शुभेच्छा मी आणि वासंती देतो, विराम.

........................................................................ श्री. मुकुंद दीक्षित.
नाशिक



डॉ. सौ. मंदावहिनी, आणि आम्ही कार्यकर्त्यांच्या सर्व बायका अगदी मिळून मिसळून रहात होतो. अगदी एका कुटुंबात रहातात तसे! कधीही मला माहेरच्यांची आठवण मंदावहिनींनी होऊ दिली नाही. आणि म्हणूनच मी अनेक वर्षे तिथे काम करू शकले. म्हणजे त्या काळात तिथे काहीही करमणूकीचे साधन नव्हते! तेव्हा मी लाहीरीहून हेमलकसा येथे हरतालिका व गणपतीसाठी तब्बल २० कि. मी. चालत जायचे आणि ते सण आम्ही सर्व जणी एकत्र साजरे करायचो! खूप मज्जा यायची! २२ कि. मी. चालत येण्याचा थकवा कुठल्या कुठे पळून जायचा! आणि रसोडयातील सगळयांसाठीचा मेनू तयार करतांना कोण मज्जा यायची! यात मदांवहिनींचा पुढाकार असायचा. पण बटाटे वडे असोत की लाडू असोत, मंदावहिनी कधीही घाई गडबड करीत नसत. त्यांना कधीही दडपण येत नसे. आतिशय शांतपणे काम करीत असत. ती शांतता स्वभावात असणं ही एकूणच आयुष्य जगण्यासाठी महत्वाची आहे, हे मंदावहिनींकडे पाहिले की प्रकर्षाने जाणवतं!

दुसरी आठवण म्हणजे माझ्या सासूबाई, ७७ साली गेल्या, तेव्हा मी लाहिरीहून सहज म्हणून हेमलकसा येथे आले होते. त्यावेळी नाशिकहून निरोप आला की मुकुंद, तुझी आई गेली! तेव्हा मंदा वहिनींनी त्यांच्या साडया मला दिल्या आणि आत्ता तुम्ही इथूनच नाशिकला जा असे सांगितले आणि आम्ही लगेचच नाशिकला आलो. त्यावेळेला मला खूपच भरून आलं की वहिनीच्या मनात किती ममता होती! कुठेही मोठेपणाचा लवलेश नव्हता, अगदी मोठया बहिणीचं प्रेम त्यांनी मला दिलं!

अजून एक आठवण म्हणजे मी लाहिरीत रहात होते. तिथे काही तेली समाजाची मराठी बोलणारी माणसं सोडली तर बाकी सर्व फक्त माडिया भाषा बोलणारी माणसच होती आणि आम्ही दोघे! त्या मुळे हेमलकसा सारखं सांस्कृतिक वातावरण तिथे नव्हतं. अनेक गैरसोयी होत्या. तिथे दूध किंवा भाजीपाला मिळत नसे. माझ्या मोठया मुलाच्या वेळी मी प्रेग्नेंट होते तेव्हा साधना ताईंनी मंदावहिनींना सांगितले की वासंतीला हेमलकसा ला बोलवून घे. तिथे (लाहिरीत) तिला व्हिटॅमिन युक्त जेवण मिळत नाही, दूध ही मिळत नाही तेव्हा तुझ्याकडे ती रहायला आल्यावर तिच्यासाठी रोज रात्री पेलाभर दूध तिच्या रूमवर ठेवत जा! आणि नंतर हेमलकसाला रहायला आले. तिथे मी कुठेही असो, रेणूका कडे किंवा प्रभा कडे, मंदावहिनी रोज रात्री जेवण झाल्यावर माझ्या खोलीत पेलाभर दुधाचा ग्लास आणून ठेवायच्या! हया आठवणी मी कधीच विसरू शकत नाही. अशा आमच्या मंदावहिनींना ७५ व्या वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

............................................................ वासंती दीक्षित,
नाशिक



प्रिय सौ. मंदाताई सप्रेम नमस्कार.

७५ व्या वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा! अमेरिकेत २५ डिसेंबर हा खूप महत्वाचा आणि आनंदाचा दिवस समजतात. त्यामुळे तुमचा वाढदिवस आम्ही दर वर्षी साजरा करतो. या निमित्ताने मला पत्र लिहायची संधी मिळाली!

२००३ च्या बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या न्यूयॉर्क च्या अधिवेशनात आपली पहिली ओझरती भेट झाली. त्यावेळी तुमच्या समाजकार्याबद्दल मला पहिल्यांदा माहिती मिळाली. तेव्हा जे ऐकलं त्याने मी इतकी भारावून गेले की १ जानेवारी २००६ मध्ये मी नोकरी सोडून वाशिंग्टनहून थेट हेमलकसाला येऊन पोहोचले. पहिले काही दिवस मी खूपच बुजून गेले होते आणि ''आपलं इथे कसं होणार'' याची भीती पण सतत वाटत होती. ही अशी मी, दीड महिन्याने हेमलकसा सोडून जाताना, आता माहेर सोडून जाणार अशा भावनेने खूप रडले. हेमलकसा हे माझं माहेर होण्याचं पूर्ण श्रेय तुम्हाला आहे. तुम्ही मला सुरूवातीपासून लहान बहिणी सारखं वागवलं. माझी काळजी घेतली आणि लाड पण केले. भामरागडचा बुधवारचा बाजार, आलापल्ली मधली खरेदी, गावातील हळदीकुंकू, संक्रातीचे १,००० तिळाचे लाडू करणं, गावा —गावात रूग्ण पाहायला जाणं— सगळयात तुम्ही मला बरोबर घेऊन गेलात. मला फळे आवडतात हे समजल्यावर तुम्ही रोज माझ्यासाठी फळे कापून ठेवत होता. सकाळ—संध्याकाळ तुम्हा दोघांबरोबर संगमाला चालत जाणं ही माझ्यासाठी एक खास पर्वणी होती. रोजची देवपूजा तुम्ही खूप श्रध्देने करता. काही दिवस तुम्ही बाहेरगावी गेला होता त्यावेळी ती पूजा करण्याचे भाग्य देखील मला मिळालं. या सगळया माझ्या पहिल्या मुक्कामाच्या आठवणी. त्यानंतर मी प्रत्येक वर्षी हेमलकसाला येत राहिले. तुम्ही आणि प्रकाशभाऊ अमेरिकेत आमच्याकडे दोनदा येऊन राहिलात याचा आम्हाला खूप आनंद झाला. त्यातून आपली जवळीक आणखी वाढली. आता आपल्या फोनवरती गप्पा होतात त्यावेळी मला प्रत्यक्ष भेटल्याचं समाधान थोडं तरी मिळतं. वीस वर्षांपूर्वी मला असं वाटलंही नव्हतं की मी एका जंगलात जाऊन राहीन आणि तिथल्या वातावरणात रमून जाईन. आता तर मला हेमलकसाला यायची आणि तुम्हाला भेटायची ओढ लागलेली असते.

तुमचं समाजकार्य, तरूण वयात सोसलेले कष्ट आणि शांत स्वभाव हे सर्व आता पुष्कळ लोकांपर्यंत पोहोचले आहे. पण मला भेटलेल्या मंदाताई फक्त माझ्याच आहेत याचा मला खूप आनंद होतो आणि मी स्वतःला खरंच भाग्यवान समजते. आपल्या दोघींचे मागच्या जन्मीचे काहीतरी धागे जुळले असावेत म्हणूनच मला ही संधी मिळाली.

तुमची,
............................................................
चंदा आठले,
वॉशिंग्टन, USA



मंदावहिनींना मी प्रथम १९८३ सालच्या मे महिन्यात, भाजून काढणाऱ्या उन्हाळयात, हेमलकसाला पाहिले. मेडिकल कॉलेजमधे त्यांना beauty queen का म्हणत असत हे लगेच लक्षात आले. लहानखुरी चण, लयबद्ध हालचाली, चेहऱ्यावर मंद प्रसन्न स्मितहास्य -आसपासचं वातावरण शांत निरामय करून टाकणारे. जंगलात, उन्हापावसात राहून कोणतेही सौंदर्य प्रसाधन न वापरता यांची स्कीन इतकी मृदू, तजेलदार कशी हा प्रश्न मनात येऊन गेला. गंमत म्हणजे आज 35-40 वर्षांनंतरही मंदावहिनी तशाच दिसतात, त्या 75 वर्षांच्या झाल्या आहेत हे मुळीच खरं वाटत नाही. आजही सकाळ संध्याकाळचे फिरणे, सायकल चालवणे चालू आहे. इतक्या वर्षात मंदावहिनींना मी कधी विश्रांती घेताना पाहिलेले नाही. सकाळपासूनच त्यांच्या त्यावेळच्या दवाखान्यात पेशंटची लांबच लांब रांग असायची. मग पेशंटशी माडिया भाषेतून संवाद सुरु होई. कष्टपूर्वक वहीत एकेक शब्द लिहून ठेवून त्यांनी माडिया भाषा आत्मसात केली होती. OPD जरी सकाळ, दुपार होती, तरी दवाखाना 24 तास चालूच असायचा. आसपासच्या असंख्य खेड्यातून येणारे रुग्ण, 50/60 किलोe h टर पायी येणारे, खाटेवर घालून खांद्यावर उचलून आणलेले रुग्ण दिवसाच्या कोणत्याही वेळी हेमलकसाला पोचायचे, अनेकदा रात्री 11/12 लाही. पेशंट आला की वेळाची पर्वा न करता मंदावहिनी व प्रकाशभाऊंचे काम सुरु व्हायचे. दुपारच्या निवांत वेळात त्या शाळेतल्या मुलांना घरी बोलावून त्यांचा अभ्यास तरी घेतील किंवा माडिया बायकांना शहरातून आणलेल्या स्वस्तातल्या साड्यांचे वाटप करतील नाहीतर लोकबिरादरी, आनंदवन, सोमनाथ अशा सर्व प्रकल्पासाठी लोणची घालतील. त्या अतिशय सुगरण आहेत. आलेल्या सर्व पाहुण्यांसाठी पूर्वी त्या स्वतः breakfast बनवत. ज्यांनी त्यांच्या हातच्या इडल्या, डोसे, मेदू वडा, भेळ आणि विशेषतः कांदा घालून केलेले साबुदाण्याचे वडे खाल्ले आहेत, ते त्याची चव कधीच विसरू शकत नाहीत. आणि हे सर्व अतिशय शांतपणे, सहजपणे, आपण काही विशेष करतो आहोत असा कुठेही अविर्भाव नाही. तो भाग जगापासून तोडणारा (cut off) मुसळधार पाऊस, उन्हाळयात 48 आणि हिवाळयात 5 डिग्री तापमान, अशा परिस्थितीत ऐन जंगलात प्राण्यापक्ष्यांच्या साथीने जगताना त्यांचा वावर इतका सहजसुंदर असतो. यामागचे गुपित असावे प्रकाश भाऊंचे व त्यांचे अतिशय खोल प्रेम, अद्वैत आणि हेमलकसा येथे केलेल्या कामातून त्यांना मिळणारे सात्विक समाधान.

मंदावहिनींना पंच्याहत्तरीच्या खूप शुभेच्छा. जीवेत शरदः शतम!

............................................................ डॉ. मंजिरी परांजपे,
पुणे



मी पहिल्यांदा हेमलकशाला आश्रमशाळेत शिक्षक म्हणून काम करण्यासाठी २७/७/१९९० ला सांयकाळी पोहोचलो. मी सोमनाथ प्रकल्पातील तत्कालीन व्यवस्थापक शंकरदादा जुमडे यांच्यासोबत आलो होतो. ९० च्या सुमारास लोकबिरादरी प्रकल्पात जे पाहुणे यायचे त्यांची व्यवस्था प्रकाशभाऊंच्या घरीच वऱ्हांडयातील उजव्या बाजूच्या रूममध्ये केली जायची. पाहुणे जास्त असल्यास भाऊंच्या घराजवळच्या पहिल्या क्वार्टरमध्ये थांबण्याची व्यवस्था केली जायची. आमची रहाण्याची व्यवस्था प्रकाशभाऊंच्याच घरी करण्यात आली. सायकांळचे जेवण सर्वासोबत मेस मध्ये झाले. दुसऱ्या दिवशी शनिवार होता. शाळा सकाळची होती. मी शिक्षक म्हणून काम करायला आल्यामुळे शाळेत गेलो होतो. मंदावहिनींनी सकाळचा नाश्ता घरीच तयार केला होता. मी शाळेकडे असल्यामुळे नाश्त्यासाठी वेळेवर घरी जाता आले नाही. प्रकाशभाऊ आणि शंकरदादा यांनी वेळेवर नाश्ता केला, पण मंदावहिनी माझी नाश्ता करण्यासाठी वाट बघत होत्या. मी जवळपास नऊच्या सुमारास भाऊच्या घरी पोहोचलो. पोहोचल्या बरोबर मंदावहिनींनी मला नाश्त्याला बोलावले. त्या दिवशी त्यांनी थालीपीठ बनवले होते. त्यांची दवाखान्यात जाण्याची वेळ झाली होती. तरीही त्या वाट बघत होत्या. मी घरी गेल्यावर त्यांनी कुठलेही प्रश्न विचारले नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावर तसे प्रश्नार्थक भावही नव्हते. अगदी प्रसन्नमुद्रेने त्या बोलत होत्या. त्या माझा नाश्ता होईपर्यंत थांबल्या. इकडच्या–तिकडच्या गप्पा चालू होत्या. नंतर त्या दवाखान्यात गेल्या. शंकरदादा परत सोमनाथला जाईपर्यंत मी त्यांच्या घरीच मुक्कामाला होतो.

मी इथेच थांबणार असल्याने रविवारी मला स्वतंत्र रूम दिली. रूममध्ये स्वतंत्र व्यवस्था आहे किंवा नाही हे त्यांनी स्वत: येवून बघितले. माझ्यासाठी पलंग, गादी, मच्छरदाणी, अंथरूण – पांघरूण, संपूर्ण व्यवस्था वहिनींनी करून घेतली. अशा प्रकारे मला त्यांच्या मातृतुल्य स्वभावाची पहिल्याच दिवशी प्रचिती आली होती.

मंदावहिनींनी फक्त माझीच याप्रमाणे काळजी घेतली असे नाही तर हेमलकशाला येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याची त्या अत्यंत प्रेमाने काळजी घेतात. प्रत्येक कार्यकर्ता व पाहुणे यांच्या व्यवस्थेची त्या जातीने काळजी घेतात. मंदा वहिनींचा असा मातृतुल्य सहवास आम्हाला सतत लाभत आहे, हे माझे व सर्व कुटुंबाचे अहोभाग्य आहे. आज त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्य त्यांना कोटी–कोटी नमन! त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभा हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

.................................................... डॉ. विलास कृष्णराव तळवेकर.
प्राचार्य,
लोक बिरादरी माध्य. आश्रमशाळा तथा कनिष्ठ महाविद्यालय, हेमलकसा.



मंदा वहिनींच्या विषयी आठवणी लिहायच्या तर काय लिहायचे? अनेक आठवणी मनात घर करून आहेत. मंदावहिनी म्हणजे शांत, सौम्य स्नेहमयी आणि सतत कार्यरत असणाऱ्या आहेत. त्यांना चिडलेलं, रागावलेलं बघितलच नाही. प्रकाशभाऊ – वहिनींना आम्ही सतत एकत्रच बघतो. फिरायला सकाळी जाण्यापासून, हॉस्पिटलमध्ये, मेसमध्ये, पाहुण्यांशी गप्पा आणि सोबत काम सतत चालू असते.

दवाखान्यात कितीही रूग्ण असले तरी, पूर्ण तपासणी होण्यासाठी कितीही वाजले तरी, त्या संपूर्ण वेळ दवाखान्यात रहातात. पूर्वी सतत दिवसभर व रात्री सुध्दा कधीही पेशंट घरी येत. दवाखान्याची विशिष्ट वेळ नव्हतीच. कधीही पेशंट आले तरी त्या उपचार करायच्या.

मेसमध्ये ही त्यांचे लक्ष असते. सणाच्या दिवशी गोड पदार्थ करायला स्वत: जातीने लक्ष देतात. शस्त्रक्रिया शिबिरामध्येही दवाखाना, मेस, पाहुणे सगळीकडे सारखचे लक्ष देतात. प्रत्येक सण उत्साहाने साजरा करणे, कार्यकर्त्यांच्या घरी वाढदिवसाला जाणे, संक्रातीला सामुहिक हळदीकुंकु करणे, यामुळे संस्थेतील वातावरण कायम घरगुती स्वरूपाचे व कौटुंबिक राहिले आहे. आम्ही सर्व एकाच कुटुंबातील आहोत असे वाटते. ते त्यांनी घेतलेल्या आमच्या काळजीमुळेच. त्या कोणताही कार्यक्रम भामरागडचा असो किंवा विदेशातील सारख्याच आत्मीयतेने जातात. अनेक पुरस्कार मिळाले तरीही त्यांची साधी रहाणी कधीही बदलली नाही. सर्वांशीच आपुलकीने, प्रेमाने, वागणाऱ्या मंदावहिनींना ७५व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

.................................................... सौ. ज्योती तळवेकर,
माध्य.शिक्षिका, लोक बिरादरी प्रकल्प



मी २००५ पासून लोकबिरादरी प्रकल्पाच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करतो आहे. त्यामुळे डॉ. मंदाताई व डॉ. प्रकाशभाऊ यांना नेहमीच जवळून बघण्याचा योग येतो. डॉ. मंदाताईंची अतिशय साधी राहणी व आदर्श जीवनशैली मला नेहमीच प्रेरणा देते.

जानेवारी २०२० मध्ये आमच्या शाळेची सहल भोपाळ येथे गेली होती. डॉ. मंदाताई व डॉ. प्रकाशभाऊ हेही मध्यप्रदेश (बैतूल) येथील एका शाळेत त्यांचा कार्यक्रम असल्याने त्याच मार्गावर होते. आमची शाळेची बस स्टेट बॉर्डर क्रॉस करून चहासाठी थांबलेली असताना, त्यांना घेऊन जाणारी गाडी ही अचानक तिथे येऊन थांबली व त्यामुळे आम्ही सर्व आश्चर्य चकित झालो! व त्यांना नमस्कार केला! त्यांना बघून आम्हा सर्वांना अतिशय आनंद झाला होता. त्यावेळी डॉ. मंदाताईंनी आम्हा सर्वांची आस्थेने विचारपूस केली. नाश्ता केला का? शिदोरी घेतली का? प्रवास कसा झाला? किती वाजता पोहोचणार? अशी आमची विचारपूस केली. आई जशी मुलांची काळजी करते अगदी तसेच डॉ. मंदाताईंच्या मातृरूपाचे दर्शन आम्हाला झाले! त्या आम्हा सर्वांची काळजी करत होत्या! हे जाणवून आम्ही सर्व सुखावलो! आम्ही त्या दिवशी भरून पावलो! आदरणीय डॉ. प्रकाशभाऊ व डॉ. मंदाताई मुद्दामहून वाटेत उतरून आम्हा सर्वांची विचारपूस करत होते तो क्षण आम्हा सर्वांना अविस्मरणीय वाटला!

आमच्या प्रकल्पावर सर्व सण साजरे होतात. पण सणावारात केलेला पदार्थ सर्वांना मिळाला की नाही हयाबाबत मंदाताई नेहमी जागरूक असतात. उदा. गणेश उत्सवात सर्वांना मोदक मिळाला की नाही हे त्या स्वत: पाहतात!

तसेच परिसर स्वच्छते बद्दल ही त्या जागरूक व आग्रही आहेत. Common Kitchen मधील अन्न वाया जाऊ नये म्हणून त्यांचा कटाक्ष असतो! बचत गटाच्या माध्यमातून बचतीचे महत्व त्यांनी जाणले आहे. त्यामुळे तोही कार्यक्रम इथे राबविला जातो.

डॉ. सौ. मंदाताईंच्यामुळे आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा आम्हा सर्वांना नेहमीच मिळते! त्यांना ७५ व्या वाढदिवसाच्या अनेक शुभेच्छा व नमस्कार! परमेश्वर त्यांना निरामय दीर्घायुष्य देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

.................................................... श्री. गिरीश कुलकर्णी
शिक्षक
लोकबिरादरी शाळा, हेमलकसा



डॉ. मंदाकिनी आमटे, भामरागड परिसरात आम्ही सगळे त्यांना 'वहिनी' म्हणून संबोधतो आणि डॉ. प्रकाश आमटेंना 'भाऊ!' खरे तर मी त्यांचे कनिष्ठ चिरंजीव अनिकेत आमटे (दादा) पेक्षा वयाने आणि कर्तृत्वाने तर निश्चितच फारच लहान आहे. पण सगळे त्यांना वहिनी म्हणतात म्हणून मी पण त्यांना वहिनीच म्हणत असतो.

मी मूळचा भामरागड तालुक्यातील धनदाट जंगलात वसलेल्या कुक्कामेटा या छोटया साठ धरांच्या गावचा! लोक बिरादरी प्रकल्पाच्या पुढे १२–१३ किलोमीटर वर छत्तीसगडच्या सीमेवर माझे गाव. वहिनींच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे छोटे कृतज्ञ मनोगत लिहितांना माझा असा परिचय सांगण्याचे तात्पर्य म्हणजे मी आणि माझ्यासारखे अनेक जर जगू शकले आणि लहानाचे मोठे होऊ शकले, त्याचे श्रेय आमच्या आई आणि वडिलांशिवाय कुणास जात असेल तर ते भाऊ आणि वहिनी आहेत.

लहान असतांना माझे वडील, भाऊ आणि वहिनींच्या बाबतीत सतत कृतज्ञतेने बोलत असत. आमचे काही दुखले–खुपले तर त्यांच्याकडे धाव घेत असत. म्हणून हया दाम्पत्याच्या बाबतीत लहान पणापासून एक विलक्षण आदर आणि आकर्षण माझ्या मनात कोरले गेले. माझ्या गावात तिसरी पर्यंतच शाळा होती. चौथ्या वर्गापासून पुढचे शिक्षण घेण्यासाठी म्हणून मी भामरागड, आमचे तालुक्याचे ठिकाण, येथे आलो. लोक बिरादरी प्रकल्प हेमलकसा पासून दोन अडीच किलोमीटर अंतर असेल! भाऊ आणि वहिनी सकाळी फिरायला येत असत आणि आम्ही त्यावेळी आंघोळीसाठी नदीवर जात असू. त्यांना दुरूनच पहात असतांना त्यांना भेटावे, त्यांच्याशी बोलावे असे नेहेमीच वाटत असे. पण लहानपणी एकटयाने भेटून त्यांच्याशी बोलण्याची हिम्मत झाली नाही.

मी एम.ए. साठी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली येथे शिकायला आल्यानंतर माझा एक चीन चा मित्र माझे गाव बघण्यासाठी सोबत आला होता. त्याला सोबत घेवून मी भाऊ आणि वहिनींना लोक बिरादरी प्रकल्प हेमलकसा येथे भेटलो. माझी त्यांच्याशी झालेली ही पहिली वैयक्तिक भेट! दोघांनाही मी चांगला शिकतोय याचे फार समाधान वाटले.

दिल्ली विद्यापीठाच्या शिवाजी महाविद्यालयातल्या हिरकणी महोत्सवात वहिनींना पहिल्यांदा ऐकण्याचे सद्भाग्य लाभले. एव्हाना मी दिल्ली विद्यापीठाच्या श्यामलाल महाविद्यालयात प्राध्यपक झालो होतो. मला वाटतं माझ्या ज्ञानाची क्षितिजं थोडी विस्तारली होती. वहिनी आणि भाऊ म्हणजे निश्चित कोण हे खऱ्या अर्थाने आता थोडे कळायला लागले होते. मी त्यांच्या अनेक मुलाखती आणि त्यांच्यावर झालेले कार्यक्रम युटयूब वर बघू लागलो. 'प्रकाशवाटा' हे भाऊंचे आत्मचरित्रवजा पुस्तक वाचले आणि डॉ. प्रकाश आमटे: द रिअल हीरो हा चित्रपट बघितला. त्यांच्याबद्दल विलक्षण आदर असणारा आणि त्यांच्या महान कार्य कर्तुत्वाचा एक प्रॉडक्ट याखेरीज मी एक समाजशास्त्राचा विद्यार्थी आणि एक शिक्षक म्हणून त्यांना समजण्याचा प्रयत्न करत होतो. त्यांच्या जीवन आणि कार्याची क्षितिजं फार विशाल आहेत.

'पाण्यातला मासा, झोपी जातो कैसा, जावे त्याच्या वंशा, कळेल तेव्हा!' असे एका कवितेत म्हण्टले आहे. मलाच काय तर कुठल्याही सामान्य माणासाला त्यांच्या कार्याच्या महानतेचा थांग लागणे शक्य नाही. त्यांच्या आदर्शातून थोडक्यात काय? तर शिकता येवू शकते! आणि या ऐहिक जीवनात थोड–तोडके करता येवू शकते.

भारतीय संस्कृतीत आपण मातृशक्तिकडे वात्सल्य आणि मृदुतेची प्रतिमा आणि त्यासोबतच दशप्रहरधारिणी दुर्गेच्या शक्ती स्वरूपात बघत असतो. वहिनी आमच्यासाठी दोन्ही तत्व एकत्र सामावलेल्या मूर्तिमंतच आहेत. ज्याकाळात गडचिरोली जिल्हयातील भामरागड परिसरात कुठल्याही किमान पायाभूत सुविधाही नसतांना त्या भाऊंसोबत येथे आल्या आणि केवळ दिगंत दादा आणि अनिकेत दादाच नाही तर माझ्यासारख्या कित्येकांच्या आई झाल्या हेच त्याचे उदाहरण आहे. बरेच लोक भाऊंच्या कार्याची तुलना नोबेल परितोषिक विजेते अल्बर्ट श्वाइट्‌जर यांनी केलेल्या आफ्रिकेतील कामाशी करतात. पण एका मुलाखतीत भाऊ बोलले त्याप्रमाणे श्वाइट्‌जर तेथे एकटेच झटले. लोकबिरादरी प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवण्यापासून तर आतापर्यंत वहिनी त्यांच्यासोबत खंबीरपणे उभ्या राहिल्या आहेत. भाऊंना महान बाबांचा वारसा तरी लाभला होता पण वहिनी नागपूर सारख्या सगळया सुखसुविधा आलेल्या शहरात वाढलेल्या, वैद्यकीय शाखेसारख्या रग्गड पैसा कमावुन देणाऱ्या व्यवसायात पोस्ट –ग्रॅज्युएट झालेल्या, तरीही त्या भाऊंसोबत भामरागड सारख्या परिसरात येवून गरीब माडिया, गोंड आणि अन्य समुदायातल्या लोकांसाठी अवघं आयुष्य अहोरात्र झिजल्या , हे अलौकिक नाही तर काय?

वहिनींबद्दल बऱ्याच ठिकाणी बरेच लिहून आले आहे. माझ्यासारखा लहान माणुस फार काय लिहू शकणार? आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लिहायचे झाले तर ग्रंथ ही अपुरा पडेल. आज त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्य दीर्घ आणि निरामय आयुष्याची कामना करतांना त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी परमेश्वर चरणी निरंतर प्रार्थना!

दिव्यत्वाची जेथ प्रचिती! तेथे कर माझे जुळती!!

.......................................... विवेकानंद नरताम.
सहाय्यक प्राध्यापक,
श्यामलाल महाविद्यालय
दिल्ली विद्यापीठ.



मी पाहिलेल्या माई.......

सार्वजनिक ठिकाणी काम करत असतांना डॉ. सौ. मंदाताई प्रकाश आमटे यांची भेट नऊ वर्षापूर्वी झाली. अत्यंत साधी रहाणी व उच्च विचार तसेच सहनशीलता, फक्त समाजाचा विचार करणाऱ्या माई! दुसऱ्याचे दुःख पाहून दुःखी होणाऱ्या माई! दोघांचे विचार एकच ध्येय एकच अशा पतीव्रता माई! कशातही दुजाभाव न करणाऱ्या माई! भाऊंच्या (डॉ. प्रकाश आमटे यांच्या) खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या माई,

नेहमी समाजासाठी आपल्या जोडीदारासोबत स्वत:ला झोकून देणाऱ्या माईच्या सहनशीलतेचे खरचं कौतुक वाटते. कुटुंबाचा वारसा भाऊसोबत पुढे नेत असतांना धरचे मातृत्व निभावतात त्या माई! आपल्या कार्यातून अनेकांसाठी मातृत्व स्वीकारत वैद्यकीय व सामाजिक कार्याने समाजापुढे आपला एक वेगळा आदर्श ठेवणाऱ्या माई! समाजासाठी प्रेरणा देणाऱ्या माई! सृष्टीशी एकरूप होणाऱ्या माई! समाजाला दिशा देणाऱ्या माई! वेळेचे महत्व जाणणाऱ्या माई! स्वतः दुःख पचवून दुसऱ्याला आनंद देणाऱ्या माई! अशा आमच्या माई ना ७५ व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा।

.......................................... श्री. कृष्णा महाडिक
व्यवस्थापक
नाना पालकर स्मृती समिती, परेल, मुंबई.



आदरणीय, डॉ. मंदाताई आमटे, (सौ. वहिनीस), साष्टांग नमस्कार! ७५ व्या वाढदिवसानिमित्य अनंत कोटी शुभेच्छा व आपणास उत्तम आरोग्य लाभो हिच परमेश्वरचरणी प्रार्थना.

सेवा, समर्पण, त्याग, संयम, ममता हया सर्वांचे एकत्रीकरण म्हणजेच— डॉ. सौ. मंदावहिनी, सौ. वहिनींची व माझी भेट प्रथमत: हेमलकसा येथे झाली, त्यांचे व प्रकाशदादांचे आदिवासी बांधवांसाठी सुरू असलेले आरोग्यसेवेचे व्रत पाहून मी थक्क झालो. व शक्य असेल तेव्हा हेमलकसा येथे कॅम्पसाठी जाऊन स्वयंसेवकाचे काम करू लागलो. तेव्हापासूनच मी त्यांचा Family Member झालो. त्यांनतर वारंवार भेटी होत राहिल्या, अशोकवनात जाणे—येणे सुरू असायचे. सौ. वहिनी अत्यंत प्रेमळ, मनमिळावू, सर्वांवर प्रेम करतात. मी आजपर्यंत कधीच त्यांना रागावलेलं बधितले नाही.

आदरणीय बाबांचे आजारपण, प्रकाशदादा ला झालेला सर्पदंश, किंवा त्यांच्या स्वत:च्या आजारपणात मी त्यांना कधीच घाबरल्याचे बधितले नाही. सर्वांना आधार देत संकटातून बाहेर काढण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे. लोकबिरादरी प्रकल्पाचा प्रत्येकजण त्यांच्यावर प्रेम करतो.

मॅगसेसे व इतर अनेक उच्च पुरस्कारांनी पुरस्कृत असून सुध्दा त्या अगदी Down To Earth आहेत. पिलू तसेच अनू ला सुध्दा त्यांनी आपल्यासारखेच घडविले. आज तिसरी पिढी सुध्दा त्यांच्या मार्गदर्शनात समाजसेवा करत आहे.

Behind a every Successful man Stands a Lady —प्रकाशदादांच्या आयुष्यातील सर्व Success मध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. माझ्या संजीवन वृध्दाश्रम प्रकल्पाचे त्यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. आदरणीय बाबा, प्रकाशदादा, विकास दादा हे सुध्दा सोबत होते. त्यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाने संजीवनचे कार्य २५ वर्षापासून सुरू आहे.

आठवणी अनेक आहेत, सर्वच नमुद करणे योग्य होणार नाही. आपल्याला निरोगी दीर्घायुष्य लाभो, व आपल्या हस्ते निरंतर आरोग्यसेवा घडत राहो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना! आपले आशिर्वाद माझ्या पाठीशी सदैव असू दयावे ही अपेक्षा.

Wish you many many Happy Returns of the Day. Happy 75th Birthday to you ! with love & affection

तेथे कर माझे जुळती..........

.................................................... आपलाच नम्र
डॉ. संजय उगेमुगे,
नागपूर



मंदावहिनींबद्दल बोलण्याकरीता शब्द आठवत नाहीत! त्या तशा शांत, प्रेमळ, चेहेऱ्यावर नेहेमी स्मितहास्य असलेल्या व पहिल्याच भेटीत समोरच्याला आपलसं करणाऱ्या आहेत. माझं त्यांच्याशी नातं हे रक्ता पलिकडचं आहे! त्या मला स्वत:च्या आईप्रमाणे आहेत. मंदावहिनी कधी रागावल्या असं आठवत नाही. तसं त्यांचं रागावणं पण शांतच!! त्यांच्या बद्दल बोलण्यापेक्षा, सांगण्यापेक्षा, किंवा लिहिण्यापेक्षा त्यांच्या बरोबरचं नातं मनांत साठवून जगण्यात जो आनंद आहे तो लिहून व्यक्त होण्यात नाही!

अशा या वहिनींना निरामय शतायुष्य लाभो ही मनापासून ईश्वर चरणी प्रार्थना!

.................................................... डॉ. कन्ना मडावी.
अहेरी



माझी आणि मंदाची ओळख माझ्या लग्नानंतर झाली. माझे पती श्री. प्रभाकर झांटये हे कै. बाबा आमटे यांना वडील मानत असत. ते बाबां बरोबर पंजाब पर्यंत भारत जोडो आंदोलनात जाऊन आलेले होते. त्यामुळे लग्नातच किंवा थोडे आधी आमची भेट झाली होती.

सौ मंदा—प्रकाशकडे आम्ही हेमलकसाला प्रथम गेलो तेव्हा तिथे वीज नव्हती. संध्याकाळ नंतर कामे कंदिलाच्या उजेडात करावी लागत. मात्र येणाऱ्या जाणाऱ्यांची काही कमी नव्हती! मंदा सगळया कामांची सुचना देऊन डॉक्टरकीच्या कामाला जात असे. नंतर शाळा असल्यामुळे सर्वांचा एकच नाश्ता व्हायचा, नंतर शाळेचे वर्ग वाढले त्यामुळे विभागणी व्हायला लागली. हे सगळे काम मंदा पहात असे. मग हळु हळु रेणुका, विलास मनोहर, गोपाळ आणि इतर मंडळी आली.

लग्न झालेल्या सर्व स्त्रियांना जी कामे करावी लागतात ती कामे मंदाने केलीच पण त्या बरोबर गाईचे दूध काढणे, त्यांची देखभाल करणे, इतर प्राण्यांची देखभाल करणे हेही आनंदाने केले. शाळा आणि लोकसंख्या वाढली तरी ही सर्व व्यवस्था सौ. मंदा आनंदाने बधायची. आणि कायम बॅलन्सड् असलेली मी तिला बधितली आहे. आता सुना सौ. अनधा व सौ. समीक्षा समर्थपणे ही कामे सांभाळतात.

प्रकाश मंदा मध्ये विसंवाद मी पाहिलेला नाही. मंदाला मी रागावलेली कधी बधितलेली नाही. मंदा आणि प्रकाश मधील इतका सुंदर Rapport सापडणे कठीण! गृहिणी, सखी, सचिव, प्रिया या सर्व भूमिकांचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. सौ. मंदा आमटे!

ईश्वर त्यांच्याकडून हयाहुनही अधिक चांगले कार्य घडवून घेवो हीच प्रार्थना.

.................................................... मीना बेहेरे—झांटये,
नागपूर.



''माय ही माय असते, दुधावरची साय असते'' ही म्हण सौ. मंदाकिनी वहिनींना अगदी तंतोतंत लागू पडते. डॉ. वहिनी ज्या आपुलकीने दवाखान्यात येणाऱ्या रोग्यांची विचारपूस करतात, ते सर्वांना जमणारे नाही. याचा अनुभव मला चांगल्या प्रकारे आहे कारण माझे हृदयविकाराचे ऑपरेशन प्रकाशभाऊ आणि वहिनींच्या मदतीने झाले होते. मी इंजेक्शन घेण्यासाठी वयाच्या ३५ व्या वर्षापर्यंत लोकबिरादरी प्रकल्पाच्या दवाखान्यात २१ दिवसांनी एकदा जात होतो.

मला व माझ्या बाळाला पहिल्यांदा नागपूरच्या दवाखान्यात नेत असतांना अशोकवन या ठिकाणी मुक्काम झाला. दुसऱ्या दिवशी नागपूरला जाण्याअगोदर आंघोळपाणी केल्यानंतर आम्हाला जेवायला बोलावले. मंदावहिनींनी पोळया लाटल्या व प्रकाशभाऊंनी त्या तव्यावर भाजल्या आणि आम्हाला स्वत:च्या हातांनी बनवलेल्या अन्नाचा घास खायला दिला. यावरून असे दिसते की रोग्यांची सेवा त्यांच्यासाठी काय आहे! आणि मी पण किती नशीबवान आहे! हे चित्र जेव्हा माझ्या डोळयासमोर उभे रहाते तेव्हा माझे मन गहिवरून जाते! मंदाकिनी वहिनींनी प्रकाशभाऊंजींना साथ दिली, ती साथ आज मैलाचा दगड ठरली म्हणूनच आज एवढा मोठा लोक बिरादरी प्रकल्प डौलदारपणे उभा आहे. जर शहरी जीवन सोडून वहिनी साहेब भाऊंसोबत आल्या नसत्या तर कदाचित प्रकल्प उभा राहून शकला नसता असं मला वाटते.

या प्रकल्पात आरोग्या सोबत शिक्षणाचा सुध्दा ठसा दूरपर्यंत उमटला आहे. कित्येक वर्षापासून लोकबिरादरीच्या शाळेत अनेक गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. या शाळेत शिक्षण घेतलेला विद्यार्थी आपल्या जीवनात नक्की यशस्वी होतो असा माझा ठाम विश्वास आहे. येथे शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज डॉक्टर, इंजिनिअर, वकील तसेच मोठे मोठे अधिकारी झाले आहेत. शिक्षणा सोबत क्रीडाक्षेत्रात सुध्दा शाळेचा नावलौकीक आहे. अशा या प्रकल्पाची उभारणी करण्यात मंदावहिनींचा खूप मोठा वाटा आहे.

लोकबिरादरी प्रकल्प नसता तर माझे ऑपरेशन झालेच नसते आणि मी आज या जगात दिसलो नसतो. मी जे काही आज आहे ही त्यांची पुण्याई आहे. माझ्या प्रमाणे कितीतरी लोकांना या प्रकल्पाचा, भाऊ व वहिनींचा आधार आहे. प्रकाशभाऊ आणि मंदाकिनी वहिनींचे उपकार मी या जन्मात तर सोडा सात जन्मातही फेडू शकणार नाही. अशा या देवीला उदंड आयुष्य लाभो. अशी मी ईश्वरचणी प्रार्थना करतो.

.................................................... संतोष सिताराम बडगे
भामरागड



मंदा वहिनी पंच्याहत्तर वर्षाची होणार या २५ डिसेंबरला! १९७८ ते ८१ मधल्या काही वर्षात मी नेमका या तारखाना हेमलकसामध्ये होतो. आजसुद्धा मला ७८ सालची मंदावहिनी आठवते. पण ती एकटी अशी कधी स्मरणात उमटच नाही. इतकं अभेद्य अस दुसरं जोडपं माझ्या अनुभवात कधी आले नाही. बाबा आणि ताई होते पण तरीही बाबा जरा जास्त ठळक असायचे.

त्यावेळी हेमलकसा जगापासून तुटलेले एक बेट होते. पावसाळयात तर संपर्कच तुटायचा! पण इतर महिन्यात ना एस.टी. होती, ना गाडया! फॉरिस्टच्या जीप आणि बल्लारपूरचे ट्रक एवढाच काय तो बाहेरच्या जगाशी संपर्क होता. इलेक्ट्रिसिटी नव्हती, आणि फोन नव्हता. त्यामुळे सात वाजता जेवण होऊन शेकोटी पेटायची. मंदावहिनीची पहिली प्रतिमा समोर उमटते ती रात्री शेकोटी भोवती आम्ही वर्तुळ करून बसलेले आहोत, ज्वालांचा प्रकाश आणि उब चेहऱ्यावर रेखा उमटवत आहेत आणि त्यात मंदावहिनी काही हसून कुणाच तरी विचित्र वागणे आठवून किणकिणते हसते आहे.

तिची मते ठाम असतात. आणि तिचा विरोध ठाम असतो. पण आपले मत मांडण्याचे एक प्रसन्न, शांत आणि किणकिणते रूप फक्त तिचे असे वेगळे असते. तिने प्रकाशबरोबर हेमलकसा कसे स्वीकारले हा मला कधी प्रश्नच पडला नाही. ती अशी याबाबत ठाम नसती तर प्रकाशसुध्दा येऊ शकला नसता, इतका तिचा या निर्णयात वाटा आहे. दोघांची एक खासियत आहे. काय वाटेल ते समोर येवो— एकदासुद्धा—ना खंत, ना पुनर्विचार, ना खंडनमंडन, ना त्रागा! वरवर सौम्य भासणाऱ्या मंदावहिनीमध्ये प्रकाशएवढाच ठामपणा आहे. आणि बोलण्यापेक्षा बॉडी लॅन्गवेजमधून समोरच्याला पोहोचवण्याची तिची पद्धत आहे. कदाचित आता कुणाचा विश्वास बसणार नाही पण प्रकाश हल्ली लोकांशी बोलायला लागला आहे. आणि मंदा वहिनी लोकांशी तेव्हढीच अबोल राहिली आहे. त्या दोघांमधला संवाद 'बघणे', ऐकणे नव्हे; एक गमतीचा प्रकार होता! मंदावहिनी काही बोलली की प्रकाशचा कटाक्ष आणि प्रकाश काही बोलला, मी विलास रेणुका किंवा आलेला पाहुणा काही बोलला तर मंदावहिनीचे फक्त श्रवण! तिचे एखादे वाक्य यायचे ते जवळपास विषय सील करायचे.

तिची दुसरी ठळक पुढे येणारी आठवण म्हणजे त्या वेळच्या ओ.पी.डी.तली. मंदावहिनी किणकिणत्या आवाजात मोजके प्रश्न विचारायची. माडिया एकुणच खूप कमी बोलणारा. अंगात १०२ ताप असला तरी ताप आहे अशी तक्रार नसणारा, फक्त अंग दुखतंय एवढीच तक्रार. या सगळयात उत्तम माडियात संवाद साधून मंदा वहिनी ट्रीटमेंट लिहायची. माझा गोंधळ घालवायला मला समजावून सांगायची. हा फाल्सीपारम मलेरिया! पुढचा पेशंट! शांतपणे तासंतास पेशंट बघायची. आणि बऱ्याच वेळा घराच्या ओसरीत सुद्धा ओ.पी. डी. सुरूच रहायची.

आज वर्क लाईफ बॅलंस महत्वाचा झाला आहे! मंदावहिनीलासुध्दा तो जमवावा लागायचा. एका दृष्टिने सोपे होते, अणि अवघडसुद्धा! पण आरती एक वर्षाची, पिलू मोठा आणि तीन चार वर्षाचा अनिकेत. घर—दार—शाळा सगळीकडे हे सगळे असायचे आजूबाजूला. त्यात भर असायची ती अगदी अलिकडे जन्मलेल्या बिबटयाच्या पिलांची. त्यांना बाटलीने दूध पाजायला लागायचे. हे सगळं पुरेसे नाही म्हणून प्रकल्पावरचे सगळे, प्रकल्पावरचे पेशंट, स्टाफ यांचा वावर असायचा. किचनचा पंडीत येऊन ताई, ताई करत समस्या मांडत असे व त्याही शांतपणे सोडवल्या जात असत.

प्रकाशचे हेमलकसा तर मंदावहिनीने आपलं मानलच पण त्याचे प्राणीसुद्ध आपले मानले. थोड्या सवतीमत्सराने. थोडी तटस्थताच असायची! आणि मुख्य म्हणजे प्रकाशबद्दल काळजी! पण एका प्रकारे मूक सम्मती होतीच अन्यथा प्रकाश ते करायला धजावता ना. पण आजुबाजूला अस्वलांची पिल्ले, बिबटयाची पिल्ले असायची! त्या वेळी प्रकल्प आणि आजुबाजूला कुणीच परक्या माणसांचा वावर नव्हता. त्यामुळे दिवस—रात्र हे सगळे पाळीव सदस्य घरा—दारात तडमडत असायचे. आणि या सगळया गोतावळयात — "काय करणार? प्रकाशने आणलेय एक सवत माझ्या उरावर!" अशी मंदा वहिनी वावरत असायची. तिचे बारीक लक्ष असायचे. प्रकाशने एक वर्षाच्या आरतीला नेगलच्या पाठीवर ठेवले त्याचा साक्षीदार मी आहे आणि मंदावहिनीसुद्धा! ती आई होती, आता आजी आहे — आणि अर्थातच बायकोही! स्त्रियांचा एकुणच स्वभाव— 'कुटुंबियांचे संरक्षक' असा असतो. त्यामुळे तिच्या पोटात नवरा, मुले, नातवंडे बिबटयाबरोबर खेळताना गोळा नक्कीच असायचा!

कुठल्याही आईसारखा मुलांना शिकवणे हा तिच्यासाठी सर्वांत मोठा स्ट्रेसफुल प्रकार. अनिकेत, आरती आणि पिलूसाठी कुणालाही हेवा वाटावा अस बालपण! आता मंदावहिनीला थोडासा मोह झाला, हल्ली जसा प्रत्येक आईला आपले मूल इंग्लिश मिडियमध्ये घालावे असे वाटते तसा! की अनिकेतला नागपूरला तिच्या माहेरी ठेऊन शिकवावे. म्हणजे त्याच्या पहिलीतली गोष्ट. त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्याची म्हणे मुलाखत घेतली. प्रश्न विचारला— "बाळा पाळीव प्राणी कोणते?" अनिकेतने सांगितले— "बिबटया, अस्वल, साप". मुख्याध्यापक जरा चमत्कारिक नजरेने बघू लागले, त्याला दुरूस्त करू लागले, अनिकेत ठाम! मंदावहिनीने निर्णय घेतला! म्हणजे मुख्याध्यापकांनी बहुतेक तिला हवे असलेले कारण पुरवले, पण तिने निर्णय घेतला. आपली हेमलकसाची शाळाच बरी! पण मग मुलांच्या अभ्यासावर लक्ष ठेवणे भाग झाले. आजुबाजूला जंगल— झाडे, प्राणी, मुले या वातावरणात अभ्यासाला बसवणे हे मंदावहिनीच्या पेशन्सचासुध्दा अंत बघणारा प्रकार होता. पण जमवायची ती. मला नाही आठवत कधी प्रकाशने अभ्यास घेतलाय. जोडीला येणारे पेशंट. स्टॉफची माणसे आणि ही मुले. या गराड्यात मंदावहिनीची चितळे मास्तरांची शाळा चालायची. "हा अन्या अजिबात अभ्यास करत नाही" हा तिचा घोष मला वाटते कोणत्याही आईचा असावा तसा! एकूण अशा वेळी शहरातली आई आणि मंदावहिनी यात फरक नसायचा! मी एकदा माझ्या एम.डी. परीक्षेचा अभ्यास करायला दोन महिने हेमलकसाला जाऊन राहिलो होतो. सकाळी चार पासून रात्री सातपर्यंत माझा अभ्यास चालू असायचा. मंदावहिनी अनिकेतला म्हणायची. "बघ! अरूणकाका कसा अभ्यास करतो आहे ते!" अन्या दातओठ खायचा! एकदा समोर उभा राहिला. "अरूणकाका बऱ्या बोलाने अभ्यास बंद कर! नाहीतर बिबटयाच्या पिंजऱ्यात सोडिन!" मला गोड धमकी आली! म्हणजे मंदा वहिनी किती टेरर होती अनिकेतसाठी त्याचा अंदाज येईल. प्रकल्प चालू होवून चार पाच वर्षे झाली होती आणि एखादा पाहुणा यायचा क्वचित चूकुन माकून. मला लख्ख आठवते ती एक शहरी बाई. म्हणजे सकाळी ती आंघोळीला जाऊन आली आणि माझ्यासमोर मंदावहिनीला म्हणाली. "अय्या तुम्ही लक्स साबण वापरता!" मंदावहिनी फक्त हसली सौम्य. मला हसू अनावर झाले आणि मी बाहेर पळालो. नंतर मी, प्रकाश, विलास आणि मंदावहिनी खूप हसलो. मंदावहिनीचा एक खास फणकाऱ्याचा सूर आहे. त्यात ती म्हणाली, मी सांगणार होते. "नाही; अंग घासायला आम्ही दगड वापरतो! अपेक्षा तरी काय असते या लोकांची? आम्ही आदिवासी भागात काम करतो म्हटल्यावर?"

मंदावहिनी ही हेमलकसाच्या सर्वच मंडळींसारखी सार्वजनिक आयुष्य जगली. सेवाभावाने काम करणे. आदिवासी भागात रहाणे. या सर्वापेक्षा रेणुका, विलास, गोपाळ, प्रकाश, मंदा या सर्वांना लोकांच्या नजरेच्या प्रकाशात रहाण्याचा, एक बंदिस्त बेटावर बारा महिने—चौवीस तास एकमेकांच्या सहवासात रहाण्याचा तणाव सहन करावा लागला असेल असे मला वाटते. आपल्यावर सतत लोकांची नजर असणे, आपला खाजगीपणा नसणे हे काय असते हे "जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे!" असे असते. मुलांचे तर खूप हाल होतात. मंदावहिनी या बाबतीत सतत सजग होती. प्रकाश, मंदावर कौतुक आणि आदराचा सतत झोत होता तो त्यांच्या कामामुळे! पण लहान मुले सुध्दा नकळत या आयत्या कौतुकाच्या झोतात सापडतात, अन असं आपल्याकडे जगाचे लक्ष असणे हा नकळत हक्क वाटू लागतो. हा झोत मिळवायला काय करावे लागते याचे भान सुटते. हे अपरिहार्य असते. मंदावहिनीचे होकायंत्र याबाबतीत सतत टिकटिकत होते. आरती, अनिकेत आणि दिगंत अनेक वावटळीतून गेले. इतर सामान्य मुलाना ज्या वावटीमधून जावे लागते, त्यातूनही गेले! आणि या अशा विचित्र न टळणाऱ्या आंदोलनातून सुध्दा! मंदावहिनी सतत सावध होती, प्रकाश स्वत:च अशा कौतुकामुळे आक्रसत होता, म्हणून ही मुले आज स्वत:च्या बळावर कर्तृत्ववान झाली आहेत. व खऱ्या अर्थाने रास्त कौतुक अनुभवत आहेत. अगदी साध्या शब्दात सांगायचे तर सार्वजनिक आयुष्यात वाढणाऱ्या या सर्वांना मंदावहिनीच्या खंबीर हाताने सावरले आहे. रस्त्यावर ठेवले आहे. अर्थाने अनघा आणि समीक्षा या तर सुना न रहाता मुली झाल्या आहेत! हे सुध्दा मंदावहिनीचे यश आहे! मंदावहिनी एका अलिप्ततेने जगते, त्यामुळे हल्ली जे 'स्पेस देणे' वगैरे म्हणतात ते सहज घडत आले आहे.

पण आज जेवढं मोहक वाटतं तेवढं तिचं आणि प्रकाशचे आयुष्य सोपं आणि सहज नाही. खूप काही भोगावे लागले आहे दोघांना. लोकप्रियतेचासुद्धा शाप असतो. भल्याभल्याना भोवळ येते, तोल सुटतो, आत्मप्रतिमेत अहंभाव राज्य करू लागतो! आणि जो मूळ रस्ता असतो तोच कुठे तरी लुप्त होतो! मंदावहिनी वेगळी ठरते— प्रकाशसह —तो तिने ज्या अलिप्ततेने हा प्रसिद्धीचा प्रकाश झेलला त्यात! म्हणजे जेव्हा महिनोन्महिने माणुस फिरकत सुद्धा नव्हता, उद्या खायला मिळेल की नाही? प्रकल्प चालू असेल की नाही? त्याची चिंता मधमाशांसारखी घोंगावत होती, तेव्हाही मंदा वहिनीच्या मनात प्रसन्नता होती आणि अलिप्तताही होती. अन पेशंटबद्दल अपार प्रेम होते! आज गरगरून टाकणारी प्रसिद्धी आली, सेल्फी घेणाऱ्यांचा आग्रह आला, अनेक पारितोषिके, परदेशवाऱ्या आल्या, हे सगळं जणू आपलं नाहीच अशा भावनेने हे सर्व अनुभवणाऱ्या पण आपल्यावर प्रेम करणाऱ्यांचा आदर राखून सर्वांशी आपुलकीने वागणाऱ्या मंदावहिनींचे गर्दीतले हे बेट बघणे हे माझ्यासाठी खरच एक विलोभनीय दृश्य आहे!


मंदावहिनी आता थोडी थकली आहे. अजूनही लोकं प्रेमाने बोलावतात! विमानाचा खर्च करतात! पण प्रकाश आणि मंदावहिनीला हेमलकसा ते नागपूर हा आठ तासांचा प्रवास कार मधूनच करावा लागतो. तेव्हा ती हळुच म्हणते— "पाय सुजतात हल्ली वय झाल्यामुळे" बस, तेवढच!

वारा खाऊन, पाऊल झेलून, मंदावहिनीचे झाड उभे आहे! त्या झाडाच्या आधाराने प्रकाश आणि हेमलकसा उभे आहे! एक शांत सळसळ आहे! प्रसन्न हसू आहे! गेल्या त्रेचाळीस वर्षाच्या या प्रवासत माझ्याबरोबर प्रकाश आणि मंदावहिनीचा हा स्पर्श सतत आहे. अव्यक्त! लोभस! आणि आश्वासक......! माझ्यासाठी हा एक समाधानाचा झरा आहे!

........................................................

डॉ. अरूण गद्रे.
पुणे.




मुग्ध तू अबोल मी
अक्षर तू शब्द मी
वचन तू निरंतर मी
सोबत तू संपूर्ण मी....




देखणी ती जीवने
जी तृप्तीची तीर्थोदके
चांदणे ज्यातून वाहे
शुभ्र पाऱ्यासारखे !!

युरोपातील मोनाको या चिमुकल्या देशाने
डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या सन्मानार्थ
पोस्टाचे तिकीट १९९५ साली प्रसिद्ध केले आहे.






दुबई येथील शासना मार्फत दिला जाणारा हमदान पुरस्कार
डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांना
२०१० साली प्राप्त झालाय.









डॉ.प्रकाश व डॉ.मंदाकिनी आमटे यांना २००८ साली आशिया खंडातील
नोबेल समजल्या जाणाऱ्या " रॅमन मॅगसेसे " पुरस्काराने सन्मानित करण्यात
आले आहे. विशेष म्हणजे एकाच परिवारातील तिघांना हा पुरस्कार मिळणे
म्हणजे खूपच दुर्मिळ योगायोग आहे. बाबा आमटे यांना हा पुरस्कार १९८५ साली प्राप्त झाला होता.






आरोग्य विद्यापीठातर्फे डॉ प्रकाश आमटे डी.लिट ने सन्मानित





सुखेच माझी मला बोचती, साहसास मम सीमा नसती
नवीन क्षितीजे सदा खुणवती, दूर दाट निबिडात मांडला, पुन्हा नवा मी डाव...









सुहास्य वदना मानिनी ही मंदाकिनी
अनंत मुलाबाळांची जणू ही प्रति जननी
हेमलकसा वासियांची ही हक्काची वहिनी
गंभीर रूग्णांच्या सेवेसाठी तप्तर जीवनदायिनी
सहसा संकोच परि नेमकेचि वदणारी संवादिनी
व्यसनमुक्तीच्या आंदोलनात 'प्रकाशा'तही लखलखती सौदामिनी
निरोगी शतायुष्य लाभो हीच प्रार्थना तव जन्मदिनी
सहर्ष वंदन करिती धनंजय—मृणालिनी !

.................................................. डॉ. धनंजय काणे

संकल्पना व संकलन : डॉ. सौ. मृणालिनी धनंजय काणे
नागपूर